cmyk

## संपादकीय

### लोकशाहीचा उतार की नव्या संघर्षाची चाहूल?

जगभरातील राजकीय घडामोडींकडे पाहिले असता सध्या एक चिंताजनक प्रवाह स्पष्टपणे जाणवतो. लोकशाही व्यवस्थेचा होत चाललेला ऱ्हास. डोनाल्ड ट्रम्प यांच्या कार्यपद्धतीभोवती निर्माण झालेली वादळे ही केवळ एका व्यक्तीपुरती मर्यादित नसून, ती जागतिक लोकशाहीच्या आरोग्याची लक्षणे दाखवणारी आहेत. 'नो किंग्ज' सारख्या आंदोलनांमधून नागरिकांचा असंतोष व्यक्त होत आहे, आणि हा आवाज केवळ अमेरिकेतच नाही तर जगभरात उमटताना दिसतो आहे.

दैनिक

www.epaper.rajyaloktantra.com

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–६ | अंक–२३ | शनिवार दि.११ एप्रिल २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## थोडक्यात...

### बोट उलटून १० पर्यटकांचा मृत्यू, अनेक जण बेपत्ता

मथुरा: मथुरेतील वृंदावन येथे यमुना नदीत पर्यटकांनी भरलेली नौका उलटल्याची हृदयद्रावक घटना घडली आहे. या भीषण अपघातात आतापर्यंत १० जणांचा बुडून मृत्यू झाला असून, २२ पर्यटकांना सुखरूप वाचवण्यात यश आले आहे. अद्यापही अनेक जण बेपत्ता असून शोधमोहीम युद्धपातळीवर सुरू असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे. शुक्रवारी (दि. १०) दुपारी पावणे तीन वाजेच्या सुमारास बांके बिहारी मंदिरापासून अडीच किलोमीटर अंतरावर असलेल्या केशी घाटाजवळ हा अपघात झाला. नदीतील पुलाजवळ भाविकांनी भरलेली ही नौका अचानक उलटली. घटनेची माहिती मिळताच स्थानिक प्रशासन आणि मदत व बचाव पथकांनी तातडीने धाव घेतली.

### भाजपापेक्षा साप बरा–ममता बॅनर्जी

परगणा: पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी भाजपवर तीव्र टीका करत बंगाली जनतेला तृणमूल काँग्रेसला मतदान करण्याचे आवाहन केले आहे. उत्तर २४ परगणा जिल्ह्यातील तेंतुलिया येथे आयोजित निवडणूक सभेत बोलताना त्यांनी भाजपवर निशाणा साधत सापावर विश्वास ठेवता येईल, पण भाजपवर नाही असे वक्तव्य केले. राज्य सुरक्षित ठेवायचे असेल तर टीएमसीला मतदान करा. संपूर्ण राज्यात टीएमसीची मीच उमेदवार आहे असे समजा, असे त्या म्हणाल्या. या वेळी त्यांनी केंद्र सरकारवरही गंभीर आरोप करत देशातील यंत्रणा निष्पक्ष राहिलेल्या नसल्याचा दावा केला. ''देशातील कोणतीही यंत्रणा आता तटस्थ नाही. भाजपने सगळ्यांनाच आपल्या ताब्यात घेतले आहे,'' असा आरोप त्यांनी केला. ममता बॅनर्जी यांनी आसाम विधानसभा निवडणुकीबाबतही शंका उपस्थित करत भाजपवर बाहेरून मतदार आणल्याचा आरोप केला. 'भाजपला स्थानिक मतदारांवर विश्वास नव्हता, म्हणून त्यांनी उत्तर प्रदेशातून तब्बल ५०,००० लोकांना रेल्वेने आसाममध्ये आणले असा दावा त्यांनी केला.

### आता रशिया–युक्रेनमध्ये युद्धविराम

मास्को : मध्य पूर्वेमध्ये गेल्या ४० दिवसांसाठी सुरू असलेले युद्ध तुर्तास थांबले आहे. इराण आणि अमेरिकेमध्ये १४ दिवसांच्या तात्पुरत्या युद्धविरामाची घोषणा झाली. त्यानंतर आता गेल्या ४ वर्षांपासून सुरू असलेल्या रशिय– युक्रेन युद्धाबाबतही मोठी बातमी आली आहे. रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादीमीर पुतिन यांनी ३२ तासांच्या युद्धविरामाची घोषणा केली असून युक्रेनही याचे पालन करेन असा विश्वास व्यक्त केला आहे. रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांनी इस्टर सणाच्या पार्श्वभूमीवर ३२ तासांच्या तात्पुरत्या युद्धविरामाची घोषणा केली आहे. युक्रेनही याचे पालन करेन, अशी आशाही पुतिन यांनी व्यक्त केली आहे. युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष वोलोडिमिर झेलेन्स्की यांनी मांडलेल्या प्रस्तावानंतर हा निर्णय घेण्यात आला आल्याचे वृत्त आहे. रशियाच्या सैन्य कमांडर्सना सर्व आघाड्यांवर सैन्य कारवाया थांबवण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. शत्रू पक्षाकडून चिथावणीखोर कारवाई झाल्यास चोख प्रत्युत्तर देण्यासाठी रशियन सैन्य सज्ज राहणार आहे.

# शेतकऱ्यांना दिलासा! पीक कर्जमर्यादेत २५% पर्यंत वाढ

## उत्पादनखर्च वाढीच्या पार्श्वभूमीवर राज्यस्तरीय तांत्रिक समितीचा मोठा निर्णय; फळबाग व पूरक व्यवसायांनाही वाढीव कर्ज

पुणे । प्रतिनिधी


**राज्यातील शेतकऱ्यांसाठी २०२६–२७ हंगामासाठी पीक कर्जदरात मोठी वाढ करण्यात आली असून, वाढत्या उत्पादनखर्चाच्या पार्श्वभूमीवर कर्जमर्यादेत १० ते २५ टक्क्यांपर्यंत वाढ करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे. राज्यस्तरीय तांत्रिक समितीच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला असून, त्याची तात्काळ अंमलबजावणी करण्याच्या सूचना जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना देण्यात आल्या आहेत.**



फळबाग क्षेत्राला विशेष प्राधान्य देत आंबा, केळी, संत्रा–मोसंबी यांसारख्या पिकांसाठी १.२५ लाख ते २.५० लाख रुपयांपर्यंत कर्जमर्यादा निश्चित करण्यात आली आहे. द्राक्षे व डाळिंब यांसारख्या उच्च मूल्य फळपिकांसाठी कर्जवाढ अधिक ठळकपणे करण्यात आली आहे. याशिवाय दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन आणि मत्स्यपालन यांसारख्या शेतीपूरक व्यवसायांसाठीही स्वतंत्र कर्जमर्यादा निश्चित करण्यात आल्यामुळे शेतकऱ्यांना उत्पन्नाचे पर्यायी स्रोत उपलब्ध होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. खत, बियाणे, मजुरी आणि इतर उत्पादनखर्चात झालेल्या वाढीमुळे कर्जमर्यादा वाढवणे आवश्यक होते, असे तज्ज्ञांचे मत आहे. या नव्या दरांची तात्काळ अंमलबजावणी झाल्यास आगामी खरीप हंगामात शेतकऱ्यांना वेळेत कर्ज उपलब्ध होणार असून शेती क्षेत्राला मोठा दिलासा मिळणार आहे.

# अवघ्या १५ दिवसात जमीन मोजणार !

## महसूलमंत्री बावनकुळेंची मोठी घोषणा



अकोला । प्रतिनिधी

**जमीन मोजणीची प्रक्रिया जलद करण्यासाठी भूमी अभिलेख विभागाच्या मदतीला आता खासगी भूमापकांची नियुक्ती केली जाणार आहे. त्यामुळे शेती आणि प्लॉट मोजणीचा वेग वाढणार असून अर्ज केल्यानंतर १५ दिवस ते एका महिन्यात मोजणी पूर्ण करण्याचा प्रशासनाचा प्रयत्न आहे, अशी माहिती महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली.**

मूर्तिजापूर तालुक्यातील लक्षेश्वर संस्थान, लाखपुरी येथे आयोजित 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिरा'च्या उद्घाटनावेळी ते बोलत होते. यावेळी आमदार रणधीर सावरकर, हरीश पिंपळे, वसंत खंडेलवाल, माजी आमदार बळीराम सिरस्कार, सरपंच राजू कैथवास, नगराध्यक्ष हर्षल साबळे, जिल्हाधिकारी वर्षा मीना यांच्यासह महसूल विभागाचे अधिकारी उपस्थित होते. मुख्यमंत्री बळीराजा पांदण रस्ते योजनेअंतर्गत शेतरस्त्यांचे काम टप्प्याटप्प्याने पूर्ण केले जाणार आहे. रस्त्यांच्या दुतर्फा वृक्षलागवड केली जाणार असून त्यामुळे


▶▶ पान २ वर

# महिला आरक्षण कायद्यातील सुधारणा म्हणजे आचारसंहितेचे उल्लंघन–खर्गे

दिल्ली । वृत्तसंस्था

**केंद्र सरकारने महिला आरक्षण कायद्यात सुधारणा करून संसदेतील जागा वाढवण्याच्या हालचाली सुरू केल्या आहेत. मात्र, सरकारचा हा प्रयत्न म्हणजे निवडणूक आचारसंहितेचे सरळसरळ उल्लंघन असून, याचे गंभीर परिणाम होतील, असा इशारा काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी शुक्रवारी दिला. काँग्रेस कार्य समितीच्या बैठकीत बोलताना त्यांनी सरकारवर सडकून टीका केली.**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकार केवळ राजकीय लाभासाठी १६ ते १८ एप्रिल दरम्यान संसदेचे विशेष अधिवेशन बोलावू पाहत असल्याचा आरोप खर्गे यांनी केला. पश्चिम बंगाल आणि तामिळनाडूमध्ये विधानसभा निवडणुका सुरू असताना घाईघाईने घटनादुरुस्ती विधेयक मंजूर करणे लोकशाहीच्या तत्त्वांना धरून



नाही, असे ते म्हणाले. या प्रस्तावामुळे देशाच्या निवडणूक व्यवस्थेवर खोलवर परिणाम होऊ शकतो, त्यामुळे यावर सखोल चर्चेची गरज असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. सरकार लोकसभेतील जागांची संख्या ५४३ वरून ८१६ पर्यंत वाढवण्याच्या तयारीत आहे. या मतदारसंघ पुनरचप्रक्रियेमुळे भविष्यात मोठी गुंतागुंत निर्माण होऊ शकते, अशी भीती खर्गे यांनी व्यक्त केली. या मुद्द्यावर काँग्रेस इतर विरोधी पक्षांशी चर्चा करून एकजूट निर्माण

▶▶ पान २ वर

# ...तर संतोष देशमुख हत्येची केस मागे घ्या

## तुरुंगातून बाहेर आलेल्या दादासाहेब खिंडकरांचा मोठा दावा

बीड । प्रतिनिधी

जुना व्हिडीओ व्हायरल करुन खोट्या प्रकरणात आपल्याला फसवण्यात आलं, आपल्याला सोडण्यासाठी सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणाची तक्रार मागे घेण्याचा प्रस्ताव धनंजय देशमुखांसमोर ठेवण्यात आल्याचा दावा दादासाहेब खिंडकर यांनी केला. दादासाहेब खिंडकर यांनी मोठा दावा केला आहे.

मस्साजोगचे दिवंगत सरपंच संतोष देशमुख यांचे भाऊ धनंजय देशमुखांचा साडू दादासाहेब खिंडकर हे १३



महिन्यांच्या कालावधीनंतर कारागृहाबाहेर आले आहेत. एका तरुणाला अमानुष मारहाण झाल्यानंतर त्याचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला होता. त्याच प्रकरणात पोलिसांनी कारवाई करत खिंडकर

▶▶ पान २ वर


# आता युपीआय पेमेंट होण्यासाठी १ तास लागणार?

## आरबीआय नियम बदलणार; वापरकर्ते चिंतेत

मुंबई । प्रतिनिधी

डिजिटल व्यवहार झपाट्याने वाढत असताना ऑनलाइन फसवणुकीचे प्रकारही वाढत आहेत. यावर लगाम घालण्यासाठी रिझर्व बँक ऑफ इंडिया (आरबीआय) आता युपीआय व्यवहारांबाबत महत्त्वाचा बदल करण्याच्या तयारीत आहे. या नव्या प्रस्तावानुसार, १०,००० रुपयांपेक्षा जास्त रकमेचा व्यवहार केल्यास पैसे लगेच समोरच्या खात्यात जमा होणार नाहीत.

या नियमांनुसार, १०,००० रुपयांपेक्षा जास्त युपीआय ट्रान्सफरवर 'कूलिंग ऑफ पीरियड' लागू केला जाणार आहे. म्हणजेच व्यवहार पूर्ण होण्यासाठी सुमारे एक तास लागेल. या काळात पैसे पाठवणाऱ्या व्यक्तीला व्यवहाराची खात्री करण्यासाठी वेळ मिळेल. जर काही संशयास्पद वाटले, तर हा व्यवहार रद्द करण्याचीही सुविधा असेल. देशात ऑनलाइन फसवणुकीची समस्या दिवसेंदिवस गंभीर होत चालली आहे. २०२६ मध्ये अशा फसवणुकीची रक्कम २२ हजार कोटी




रुपयांपेक्षा जास्त होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. विशेष म्हणजे, बहुतेक फसवणूक ही तांत्रिक त्रुटींमुळे नव्हे, तर 'सोशल इंजिनिअरिंग'द्वारे केली जाते. फसवणूक करणारे फोनवरून लोकांना फसवतात किंवा घाबरवून पैसे ट्रान्सफर करून घेतात. आरबीआयच्या या प्रस्तावामुळे मोठ्या रकमेचे व्यवहार करताना लोकांना विचार करण्यासाठी वेळ मिळेल आणि त्यामुळे फसवणुकीचे प्रमाण कमी होईल, अशी अपेक्षा आहे. या नव्या नियमांत काही सवलतीही देण्यात आल्या आहेत.

▶▶ पान २ वर



# ठाकरेंच्या ८ खासदारांसोबत शिंदेंची गुप्त बैठक झाल्याची चर्चा

मुंबई । प्रतिनिधी

राज्यात 'ऑपरेशन टायगर'च्या चर्चांनी पुन्हा जोर धरला असून, ठाकरे गटातील खासदारांना फोडण्याच्या हालचाली सुरू असल्याची माहिती समोर येत आहे. दिल्लीकडून अधिकृत हिरवा कंदील नसल्याचे बोलले जात असले तरी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे पडद्यामागे प्रयत्न करत असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे.

सूत्रांच्या माहितीनुसार, बुधवारी रात्री ठाण्यात एकनाथ शिंदे आणि ठाकरे गटातील काही खासदारांची गुप्त बैठक झाल्याचे सांगितले जात आहे. या बैठकीत उद्धव

▶▶ पान २ वर

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती,

बीड, दि.१० एप्रिल २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
| --- | --- | --- | --- |
| गहू: ९९.५० क्विंटल | १,९०० | २,८३० | २,३२५ |
| ज्वारी/हायब्रिड: ११८.५० क्विंटल | १,९०० | ४,००० | २,८०६ |
| मका/लोकल: ३.५० क्विंटल | १,५०० | १,५०० | १,५०० |
| तूर : १.५० क्विंटल | ७,४३० | ७,४३० | ७,४३० |
| उडीद : २.५० क्विंटल | ६,३५४ | ६,३५४ | ६,३५४ |
| बाजरी: ३७.५० क्विंटल | १,८०१ | २,६४१ | २,३५५ |
| मुग: २.०० क्विंटल | ७,८०० | ७,८०० | ७,८०० |
| सोयाबीन: १८.५० क्विंटल | ५,५०० | ५,५०० | ५,५०० |
| हरभरा: १६.०० क्विंटल | ५,००० | ५,२५० | ५,१६४ |

# सीएम साहेब डीएमला मंत्री करा! पीएम चे कान मात्र दोन्ही अण्णांकडे






बीड । प्रतिनिधी

संतश्रेष्ठ वैकुंठवासी संत वामनभाऊ महाराज यांचा नारळी सप्ताह म्हसोबाचीवाडी तालुका आष्टी येथे पार पडला. या कार्यक्रमाला सीएम म्हणजेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस स्वतः उपस्थित राहीले. धार्मिक कार्यक्रम झालाच मात्र त्याला राजकीय किनार भाषणामधून लागली. मुख्यमंत्री फडणवीस यांचे भाषण सुरू असताना, एका भक्ताने थेट डीएम म्हणजे धनंजय मुंडे यांना मंत्रिमंडळात घेण्याची मागणी केली, तर त्यापूर्वी पीएम म्हणजेच पंकजा मुंडे आपल्या भाषणात बोलत असताना बंधू धनंजय मुंडे आणि सुरेश धस यांच्यामध्ये सुरू असलेली चर्चा आणि ते ऐकत असलेले माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर अण्णा यांचा उल्लेख केला. माझे कान सर्वत्र असतात असे व्यक्त होत जिल्ह्यामध्ये काय चालले आहे याची मला माहिती असल्याचे त्यांनी सांगितले.

संतश्रेष्ठ संत वामनभाऊ महाराज यांच्या नारळी सप्ताहाचा कार्यक्रम मसोबाचीवाडी तालुका आष्टी जिल्हा बीड येथे गुरुवारी मोठ्या उत्साहात पार पडला. या सप्ताहाच्या सांगता समारोहासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मंत्री पंकजा मुंडे, माजी मंत्री आमदार धनंजय मुंडे, आमदार सुरेश धस, माजी आमदार भीमराव धोंडे, माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर, माजी आमदार बाळासाहेब आजबे यांसह अन्य लोकप्रतिनिधी उपस्थित होते. हा कार्यक्रम धार्मिक असला तरी या कार्यक्रमाला राजकीय वळण लागले ते असे. कार्यक्रमाच्या शेवटी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे भाषण सुरू होते, त्याच दरम्यान एक भाविक भक्त उठला आणि त्यांनी थेट धनंजय मुंडे यांच्या मंत्रिमंडळ समावेशाची मागणी केली. बोलताना हा भक्त म्हणाला, तुम्ही आम्हाला सांभाळतात, आमच्या धनु भाऊला सांभाळून घ्या, त्यांना मंत्री करा. ते मंत्री झाले तर तुमचे अर्धे काम हलके होईल. त्या भक्ताचे हे बोलणे दिवसभर सोशल मीडियावर सुरू होते. या भक्ताचे सर्व बोलणे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ऐकून घेतले, परंतु त्यापूर्वी व्यासपीठावर अनेक क्षण कॅमेऱ्यात टिपले गेले. माजी मंत्री धनंजय मुंडे आणि सुरेश धस यांच्यामध्ये वैचारिक मतभेद आहेत हे सर्वांना ठाऊक आहे, मात्र या कार्यक्रमात पहिल्यांदाच संत वामन भाऊ यांच्या नारळी सप्ताहाच्या समारोप

▶▶ पान २ वर

छत्रपती संभाजी नगर (धुत हॉस्पिटल) येथील सुप्रसिध्द डॉक्टर
आता आपल्या बीडमध्ये उपलब्ध
डॉ.जगदीश श्रीराम टेकाळे
एम.बी.बी.एस., एम.डी.,
मानसोपचार तज्ञ ( Gold Medalist)
न्युरो सायकियाट्रिस्ट, व्यसनमुक्ती तज्ञ, सेक्सोलॉजीस्ट
मो.9518551503 / 9545615352



महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या रविवारी बीड शहरात
सकाळी : १०.०० ते दुपारी २.०० वा.
साई (गवते) कॉम्प्लेक्स, डी.पी.रोड, डॉक्टर लाईन, बस स्टॅण्डच्या पाठीमागे,बीड
दुपारी २.३० ते ६.०० वा. डॉ.विश्वास जोशी यांच्या दवाखान्या समोर
प्रगती होमिओ क्लिनिक धोंडीपुरा, टिळक रोड,बीड
खालील आजारांचे निदान व उपचार
● डोकेदुखी / अती चिंता व काळजी
➡ (सतत टेन्शन, घाबरटपणा,घाम सुटणे, थरकाप सुटणे, हाता–पायात मुंग्या येणे)
● झोपेच्या समस्या
➡ (झोप न येणे, झोपेत चालणे, बडबड करणे, चक्कर येणे, दातखिळी बसणे)
● व्यसनाधिनता : (दारु, तंबाखू, गुटखा, धुम्रपान)
● बालकांच्या समस्या :
➡ (झोपेत लघवी करणे, हट्टीपणा, चिडचीडेपणा, अभ्यासात कमी)
● स्मृती भंग (विसरभोळेपणा)
● लैंगिक समस्या
➡ (लवकर वीर्य पतन होणे,सेक्सची इच्छा न होणे,कमजोरी,स्वप्नदोष)
● स्क्रिझोफ्रेनिया व इतर मानसिक समस्या



नोंदणी व अधिक माहितीसाठी संपर्क
मो. 8237353737 / 8182839922
कु.डॉ.जयश्री श्रीराम टेकाळे (M.B.B.S.) वैद्यकिय अधिकारी, मो.7743990988
श्रीराम टेकाळे (पुर्व गट शिक्षणाधिकारी, पाटोदा/शिरुर/बीड) सामाजिक कार्यकर्ते,पाटोदेकर मो.9075387638

cmyk

## अग्रलेख

# लोकशाहीचा उतार की नव्या संघर्षाची चाहूल?

जगभरातील राजकीय घडामोडींकडे पाहिले असता सध्या एक चिंताजनक प्रवाह स्पष्टपणे जाणवतो. लोकशाही व्यवस्थेचा होत चाललेला ऱ्हास. डोनाल्ड ट्रम्प यांच्या कार्यपद्धतीभोवती निर्माण झालेली वादळे ही केवळ एका व्यक्तीपुरती मर्यादित नसून, ती जागतिक लोकशाहीच्या आरोग्याची लक्षणे दाखवणारी आहेत. 'नो किंग्ज'सारख्या आंदोलनांमधून नागरिकांचा असंतोष व्यक्त होत आहे, आणि हा आवाज केवळ अमेरिकेतच नाही तर जगभरात उमटताना दिसतो आहे.

अमेरिकेसारख्या प्रस्थापित लोकशाही देशात हजारो आंदोलनांचा उद्रेक होणे ही गंभीर बाब आहे. लोकशाहीत सत्ताधाऱ्यांकडून उत्तरदायित्वाची अपेक्षा असते; परंतु जेव्हा सत्ता केंद्रीत होत जाते आणि निर्णयप्रक्रिया मनमानीकडे झुकते, तेव्हा नागरिक रस्त्यावर उतरतात. स्थलांतरितांविरोधातील धोरणे, प्रशासकीय कठोरता आणि सत्तेचा वाढता हस्तक्षेप यामुळे सामान्य नागरिकांमध्ये असुरक्षिततेची भावना वाढीस लागली आहे. इंटरनॅशनल आयडिया या आंतरराष्ट्रीय संस्थेच्या अहवालानुसार, जगातील सुमारे ५४ टक्के देशांमध्ये लोकशाहीच्या गुणवत्तेत घसरण झालेली आहे. हा आकडा केवळ सांख्यिकीय नसून, तो लोकशाहीच्या मूलभूत मूल्यांवर आलेल्या संकटाचा पुरावा आहे. कायद्याचे राज्य, अभिव्यक्ती स्वातंत्र्य आणि राजकीय हक्क यांसारख्या स्तंभांवरच आज प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. युद्धे ही या स्थितीची एक कारणे असली तरी ती मूळ कारण नाहीत. इराण, उक्रेन, रशिया यांसारख्या संघर्षांमुळे निर्माण झालेली अस्थिरता लोकशाहीला कमकुवत करते; पण त्यामागे असलेली मानसिकता सत्तेची लालसा, वर्चस्व गाजवण्याची प्रवृत्ती आणि विरोधकांचा आवाज दडपण्याची वृत्ती ही खरी धोक्याची घंटा आहे.

अनेक देशांमध्ये लोकशाही मार्गाने निवडून आलेली नेतेमंडळीच हळूहळू हुकूमशाहीकडे झुकताना दिसत आहेत. निवडणुका जिंकून सत्तेत आलेले नेते लोकशाहीचे नियम आपल्या सोयीनुसार बदलू लागतात. निवडणूक प्रक्रिया, न्यायव्यवस्था आणि माध्यमे यांच्यावर नियंत्रण मिळवून ते स्वतःची सत्ता अबाधित ठेवण्याचा प्रयत्न करतात. हीच प्रवृत्ती लोकशाहीचा गळा घोटण्यास कारणीभूत ठरत आहे.

याहून गंभीर बाब म्हणजे 'नायकपूजे'चा वाढता प्रभाव. एखाद्या व्यक्तीला सर्वसत्ताधीश बनवण्याची प्रवृत्ती लोकशाहीच्या मूळ तत्त्वांनाच हरताळ फासते. अनेक देशांमध्ये एकाच व्यक्तीच्या किंवा कुटुंबाच्या हाती दशकानुदशके सत्ता केंद्रित होत आहे. यामुळे सत्तेचे संतुलन बिघडते आणि लोकशाही संस्थांचे महत्त्व कमी होत जाते. लोकशाहीचा गाभा हा सहमती आणि संवादात आहे. मात्र, आज असहमतीला शत्रुत्वाचे स्वरूप दिले जात आहे. टीका सहन करण्याची क्षमता कमी झाली आहे. विचारस्वातंत्र्य, अभिव्यक्ती आणि सांस्कृतिक विविधता यांवर बंधने येत आहेत. विनोद, कला किंवा मतभेद यांनाही संघर्षाचे कारण बनवले जात आहे.

या सर्व पार्श्वभूमीवर एक मूलभूत प्रश्न उभा राहतो, लोकशाही टिकवायची कशी? याचे उत्तर केवळ सरकारांकडे नाही, तर नागरिकांकडेही आहे. लोकांनी आपल्या अधिकारांची जाणीव ठेवली पाहिजे आणि त्यांचा निर्भयपणे वापर केला पाहिजे. न्यायव्यवस्था, माध्यमे आणि नागरी संस्था यांची स्वायत्तता जपली गेली पाहिजे. लोकशाही ही केवळ एक व्यवस्था नाही, तर ती सतत जपावी लागणारी मूल्यप्रणाली आहे. तिचे रक्षण करण्यासाठी संघर्ष अपरिहार्य आहे. आज जगभरात जे आंदोलनांचे स्वर उमटत आहेत, ते लोकशाहीच्या पुनरुज्जीवनाची चिन्हेही असू शकतात, जर त्यांना योग्य दिशा मिळाली तर. अन्यथा, सत्ता केंद्रीकरण, युद्धे आणि असहिष्णुता यांच्या छायेत लोकशाहीचा प्रकाश मंदावत जाण्याची भीती नाकारता येणार नाही.

# मस्साजोगमध्ये एकाच रात्री आठ ठिकाणी चोऱ्या

बीड । प्रतिनिधी

**केज तालुक्यातील मस्साजोग गावात मध्यरात्री सात ते आठ ठिकाणी घरफोडीची घटना समोर आली आहे. या गावाचे दिवंगत माजी सरपंच संतोष देशमुख यांच्या निवासस्थानाला चोरट्यांनी आपले लक्ष केले असून, ज्या वेळी ही घटना घडली त्या वेळी कुटुंबातील सर्व सदस्य गाढ झोपेत होते.**

ही चोरी मध्यरात्रीच्या सुमारास अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने करण्यात आल्याचे दिसून येत आहे. एकाच रात्रीत चोरट्यांनी ठिकठिकाणी धुडगूस घालून ऐवज लंपास केला असून शेतकऱ्यांच्या कॉपर केबलची मोठ्या प्रमाणात चोरी झाल्याचे समोआले आहे. दिवंगत संतोष देशमुख यांचे बंधू धनंजय देशमुख, पत्नी अश्विनी देशमुख, त्यांची आई आणि कुटुंबातील इतर सर्व सदस्य घरात उपस्थित होते. हे सर्व सदस्य आपापल्या खोलीत झोपलेले असताना चोरट्यांनी घरात प्रवेश केला. विशेष म्हणजे, घरात इतकी माणसे असतानाही कोणालाही या चोरीचा सुगावा लागला नाही. सकाळी जेव्हा घरातील सदस्य झोपेतून जागे झाले, तेव्हा त्यांना घरातील सामान अस्ताव्यस्त पडलेले दिसले. चोरी झाल्याचे लक्षात येताच कुटुंबाने तातडीने आरडाओरडा केला आणि या घटनेची माहिती पोलिसांना देण्यात आली. घटनेची माहिती मिळताच मस्साजोग गावात केज पोलीस स्टेशनचे पथक तातडीने दाखल झाले. प्रकरणाचे गांभीर्य ओळखून बीड स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकालाही पाचारण करण्यात आले आहे. चोरट्यांचा माग काढण्यासाठी फॉरेन्सिक टीम देखील घटनास्थळी पोहोचली. पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा करण्यास सुरुवात केली. पोलीस प्रशासनाकडून सध्या वेगाने तपास चक्रे फिरवली जात असून लवकरच आरोपींना अटक करण्यात येईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. दरम्यान चोरट्यांनी शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान केले असून अनेक ठिकाणी शेतकऱ्यांचे कॉपर केबल चोरीला गेले आहेत. तब्बल ७ लाखापर्यंतचे केबल चोरी गेले असून पोलिसांनी तातडीने या चोरीचा तपास करावा अशी मागणी धनंजय देशमुख यांनी केली आहे.

# आ. संदीपभैय्यांच्या प्रयत्नाने उर्दू घर होणार

बीड । प्रतिनिधी



**शहरातील अल्पसंख्याक मुलींच्या वसतिगृहासाठी जागा उपलब्ध झाल्या नंतर आता आ. संदीप क्षीरसागर यांनी उर्द घरासाठी प्रयत्न सुरू केले आहे. या प्रकरणी त्यांनी शुक्रवारी (दि.१०) मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन बीड येथे उर्दू घराला मंजुरी आणि निधी देण्याची मागणी केली. याबाबत मुख्यमंत्र्यांनी मागणी पूर्ण करण्याचे आश्वासन दिले असल्याचे आ. क्षीरसागर यांनी सांगितले आहे. अल्पसंख्याक समाजाच्या अनेक दिवसांच्या मागण्या पूर्ण होण्याच्या दृष्टीने हे महत्त्वाचे पाऊल आहे.**

शहरात आणि जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात अल्पसंख्याक समाज आहे. यामुळे बीड शहरात अल्पसंख्याक मुलींचे वसतिगृह आणि उर्दू घरची मागणी करण्यात येत आहे. यासाठी आ. संदीप क्षीरसागर यांचा सातत्याने पाठपुरावा सुरू आहे. याचे फलित म्हणून मार्च महिन्यात रमजान ईद च्या दिवशीच येथील किल्ला परिसरातील डाक बंगला म्हणून प्रसिद्ध असलेली जागा अल्पसंख्याक मुलींच्या वसतिगृहासाठी नगर विकास विभागाकडे वर्ग करण्यात आली आहे. यामुळे मुख्य जागेचा प्रश्न निकाली निघाल्याने आता याला मंजुरी मिळून हे वसतीगृहाचा प्रश्न मार्गी लागणार आहे. यानंतर आता उर्दू घरासाठी आ. संदीप क्षीरसागर यांनी प्रयत्न सुरू केले आहेत. त्यांनी आज शुक्रवारी (दि.१०) मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली आहे. उर्दू घर संबंधी मुख्यमंत्र्यांना निवेदन दिले. यामध्ये आ. संदीप क्षीरसागर यांनी म्हटले आहे की, महाराष्ट्रात उर्दू भाषेची वाङ्मयीन प्रगती व्हावी तसेच मराठी व उर्दू भाषेमधील लेखक, कवी, विचारवंत इत्याधींमध्ये सर्जनशील विचारांची देवान - घेवाण होऊन उर्दू भाषेचा वाङ्मयीन विकास व्हावा या उद्देशाने महाराष्ट्र शासन उर्दू घर सारखा स्तुत्य उपक्रम राबवत आहे.

# परळीत मतदार याद्यांच्या पुनरीक्षणासाठी १२ व १३ एप्रिलला विशेष कॅम्प

परळी वै । वार्ताहर

**राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांच्या निर्देशानुसार शहरात येत्या १२ व १३ एप्रिल रोजी मतदार याद्यांच्या पुनरीक्षणासाठी विशेष कॅम्प आयोजित करण्यात आला आहे. शहरातील भाजपचे सर्व बुथ प्रमुख प्रशासनाने नेमलेल्या बीएलओला यासाठी सहकार्य करणार असून प्रत्येक मतदारांनी स्वतःचे व कुटुंबातील सदस्यांचे नावाची तपासणी करून घ्यावी असे आवाहन करण्यात आले आहे.**

विधानसभा मतदार संघाच्या मतदार यादीचे विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रम महाराष्ट्र राज्यात सुरुवात करण्याची घोषणा भारत निवडणूक आयोग करणार आहे. त्याअनुषंगाने दिनांक ३०.१०.२०२४ रोजी अस्तित्त्वात असलेली विधानसभा मतदार संघाची यादीवरुन सन २००५ च्या मतदार यादीमधील मतदारांची मॅपींग करणे, अस्पष्ट फोटो, मतदारांचे नवीन रंगीत फोटो गोळा करणे अदयावत करणे तसेच मयत, दुबार, स्थलांतरीत व डीएससी च्या नोटीसची पडताळणी करुन त्यावर योग्य ती कार्यवाही करणे आदी कामे विहित मुदतीत पार पाडण्याबाबत निर्देश देण्यात आले आहेत. परळी विधानसभा मतदार संघाअंतर्गत परळी तालुक्यातील २५८ मतदान केंद्र प्रस्तावित असून सदर मतदान केंद्रासाठी केंद्रस्तरीय अधिकारी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. सदर कामकाज पूर्ण करण्यारीता दिनांक १२ व १३ रोजी विशेष मतदार मॅपींग कॅम्प चे आयोजन करण्यात आलेले आहे. त्यानुसार सर्व मतदान केंद्रावर सकाळी १० ते सायं.५ या वेळेत सर्व बीएलओ मतदान केंद्रावर उपलब्ध असणार आहेत. तरी जास्तीत जास्त मतदारांनी मतदान केंद्रावर जावून आपापले मतदार मॅपींग, अस्पष्ट फोटो जमा करणे, व दुबार नावे, मयत व स्थलांतरीत नावे वगळणे इत्यादी कामे करून घ्यावीत. भाजपचे बुथ प्रमुख व पदाधिकारी प्रशासनाच्या मदत करणार असून मतदारांनी संबंधित बुथ प्रमुखांना अथवा भाजपच्या पदाधिकाऱ्यांना संपर्क करावा असे आवाहन ना. पंकजाताई मुंडे यांच्या संपर्क कार्यालयाने केले आहे.

# स्वयंपाकघरातील औषधी वनस्पती प्रदर्शनाचे बीडमध्ये आयोजन

## आदित्य आयुर्वेद महाविद्यालय चे प्राचार्य डॉ.विवेक कुलकर्णी यांचे नागरिकांना सहभागाचे आवाहन

बीड। प्रतिनिधी

**जागतिक आरोग्य दिनाचे औचित्य साधून आदित्य आयुर्वेद महाविद्यालय व संशोधन केंद्र, बीड यांच्या वतीने स्वयंपाकघरातील औषधी वनस्पतींचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे. या आगळ्यावेगळ्या उपक्रमात जास्तीत जास्त नागरिकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन आदित्य आयुर्वेद महाविद्यालय चे प्राचार्य डॉ. विवेक कुलकर्णी यांनी केले आहे.**

आपल्या स्वयंपाकघरात अशा अनेक वनस्पती आणि मसाले आहेत, जे केवळ अन्नाची चव वाढवत नाहीत तर उत्तम औषधी म्हणूनही काम करतात. या प्रदर्शनात अशा जवळपास १०० हून अधिक वनस्पतींची माहिती, त्यांचे महत्त्व आणि वापरण्याची योग्य पद्धत प्रत्यक्ष दाखवली जाणार आहे. या प्रदर्शनात प्रामुख्याने खालील घरगुती औषधांच्या फायद्यांविषयी मार्गदर्शन केले जाईल: मिरे: सर्दी-खोकला आणि घशातील खवखव कमी करण्यासाठी उपयुक्त. हळद: रोगप्रतिकारशक्ती वाढवण्यासाठी आणि जखम भरून काढण्यासाठी ( गुणधर्म). सुंठ: सांधेदुखी कमी करण्यासाठी आणि रक्ताभिसरण सुधारण्यासाठी. इलायची: पचन सुधारण्यासाठी आणि रक्तदाब संतुलित ठेवण्यासाठी. व १०० हून अधिक वनस्पतींची माहिती साठी स्टॉल असतील. ''घरगुती वनस्पतींचा वापर करा, आयुष्य आपले सुंदर करा.'' असा संदेश देत डॉ. कुलकर्णी यांनी नमूद केले सुवर्णसंधीचा लाभ सर्व नागरिकांनी घ्यावा आणि आपल्या आरोग्याप्रती जागरूक व्हावे. सदर प्रदर्शन शनिवार, दि. ११ एप्रिल २०२६ रोजी सायं. ४ ते ७ या वेळेत राष्ट्रीय कन्या शाळा, सारडा पार्क, लेन नं. ३, एम.आय.डी.सी. एरिया, बीड येथे आयोजित करण्यात आले आहे. या उपक्रमाचा लाभ घेण्यासाठी सर्व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आदित्य आयुर्वेद महाविद्यालय चे प्राचार्य डॉ. विवेक कुलकर्णी यांनी केले आहे.

# छत्रपती शिवाजी महाराज चौक ते बार्शी नाका रस्त्याचे काम पावसाळ्यापूर्वी पूर्ण करण्याचे निर्देश

## जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी घेतला आढावा

बीड । प्रतिनिधी

**बीड शहराच्या मध्यवर्ती भागात असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज चौक ते बार्शी नाका रस्त्याचे काम अत्यन्त संथ गतीने सुरु असून यामुळे नागरिकांची गैरसोय होत आहे. या कामाला गती देऊन पावसाळ्यापूर्वी काम पूर्ण करावे असे निर्देश जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी दिले.**



याबाबत आज जिल्हाधिकारी कार्यालयात एका बैठक घेण्यात आली. या बैठकीत निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी तसेच बांधकाम विभागाचे अधिकारी व काम करणाऱ्या कंत्राटदार कंपनीचे अधिकारी उपस्थित होते. शहराच्या मध्यवर्ती भागात असलेल्या दोन किलोमीटर शंकराच्या रस्त्याचे काम अतिशय संथ गतीने चालू आहे अनेक ठिकाणी खड्डे खोदून ठेवण्यात आले आहेत यामुळे वाहनधारकांना वेळ देता येईल मोठ्या प्रमाणात त्रास होत आहे तसेच सातत्याने वाहतूक कोंडी होण्याचे प्रकार येथे घडत आहेत. या कामाच्या गतीसाठी मनुष्यबळात वाढ करून येणाऱ्या पावसाळ्यापूर्वी हे काम पूर्ण करावे असे जिल्हाधिकारी यावेळी म्हणाले. या कामाच्या प्रगतीचा आढावा मे महिन्यात पहिल्या आठवड्यात एका बैठकीत घेतला जाणार आहे.

# क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त आयोजित शिवकालीन मर्दानी खेळांनी जिंकले बीडकरांचे मन!



बीड । प्रतिनिधी

**स्त्री शिक्षणाचे आद्य जनक, ज्यांनी पहिली मुली, महिलांसाठी शाळा निर्माण करुन मुली व महिलांच्या शिक्षणाची द्वारे खुली केली असे क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेच्यावतीने समता परिषदेचे राष्ट्रीय संस्थापक अध्यक्ष छगनराव भुजबळ, माजी खासदार समीरभाऊ भुजबळ, आमदार पंकजभाऊ भुजबळ यांच्या मार्गदर्शनाखाली आणि समता परिषदेचे प्रदेश सरचिटणीस तथा सिनेट सदस्य ॲड. सुभाष राऊत यांच्या नेतृत्वाखाली जयंतीच्या निमित्त पूर्वसंध्येला बीड शहरातील महात्मा ज्योतिबा फुले आणि सावित्रीबाई फुले यांच्या पुतळ्याजवळ मोठ्या जल्लोषात शिवकालीन मर्दानी खेळाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी बाल कलाकारांनी साकारलेल्या चित्त थरारक कसरतीनी बीडकरांचे मन मंत्रमुग्ध केले.**

याप्रसंगी ॲड. सुभाष राऊत यांच्यासह भाजपाचे युवा नेते डॉ. योगेश क्षीरसागर, भाजपाचे तालुकाध्यक्ष अशोक लोढा, नगरसेवक शुभम धूत, जेष्ठ पत्रकार ॲड. संदीप बेदरे, परीट समाजाचे ज्येष्ठ नेते गणेश जगताप, सामाजिक कार्यकर्ते भागवत तावरे, पत्रकार संग्राम धनवे, पत्रकार नारायण नागरे, पत्रकार ज्ञानोबा वायबसे, श्रीरामनाना ढवळे, महोत्सव समितीचे मार्गदर्शक प्रा. लक्ष्मण गुंजाळ, समता परिषदेचे जिल्हाध्यक्ष निखील शिंदे, समता परिषदेचे जिल्हा उपाध्यक्ष नितीन साखरे, बीड शहराध्यक्ष नितीन राऊत, माळी महासंघाचे जिल्हाध्यक्ष धनंजय काळे, दिलीप बेंद्रे, रंजित सोन्नर, शेखर पवार, भारत कांबळे, पत्रकार प्रचंड साळुंके, क्रांतीसुर्य महात्मा फुले सार्वजनिक जयंती उत्सव समितीचे माजी अध्यक्ष अजिंक्य सुरवसे, सार्वजनिक जयंती उत्सव समितीचे नूतन अध्यक्ष स्वप्नील शिंदे, उपाध्यक्ष आदित्य शिंदे, कोषाध्यक्ष महेश व्यवहारे, सचिव शरद विटकर, सहसचिव रोहित जमदाडे यांच्यासह जयंती उत्सव समितीचे पदाधिकारी तसेच निलेश राऊत, अजय काळे, दत्ता राऊत, विशाल राऊत, सुरज राऊत, ऋषिकेश आखाडे, दीपक थोरात, संतोष यादव, ज्ञानेश्वर राऊत, अजय भानुसे, कृष्णा मेत्रे, अमोल राऊत, अभिजीत दहिवाळ, अविनाश शिंदे, अभिजीत मुंडे यांच्यासह फुले, शाहू, आंबेडकर प्रेमी व सर्व समाजातील नागरिक, समता सैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.


## मोतीराम अग्रवाल जालना मर्चंट्स को-ऑप. बँक लि., जालना

MAJMB

### जाहीर आव्हान

बँकेच्या सर्व सभासद ग्राहक ठेवीदार यांना जाहिर आव्हान करण्यात येते की, मोतीराम अग्रवाल जालना मर्चटस् को-ऑप. बँकेचे डोंबिवली नागरी सहकारी बँक लि., डोंबिवली (पुर्व) मध्ये विलीनीकरण (मर्जर) होणार असुन बँकेत असलेल्या चालु, बचत व सर्व प्रकारच्या मुदत ठेवीदारांचे बँकेच जमा असलेले रक्कम मिळेल. सर्वांनी भावनिक (पॅनिक) न होता सहकार्य करावे ही विनंती.

(शिक्का)

स्वाक्षरीत/-
आपला
मुख्य कार्यकारी अधिकारी

CONFIDENTIAL

डोंबिवली नागरी सहकारी बँक लि.
DNS BANK (मल्टी-स्टेट शेड्यूल्ड बँक)

DNSB/CO/P&O/2026-27/2

April 09, 2026

The Chief Executive Officer
Jalna Merchant Co-operative Bank Ltd.

Dear Sir,

Kind Attention: Mr. Kanchan Kelkar

Sub: Voluntary merger with Dombivli Nagari Sahakari bank Ltd.

With reference to discussion our Board Members and MD & CEO of our bank with you, we are interested in going for merger subject to satisfactory due diligence of your bank.

We, therefore, request your good office to kindly accord us permission to initiate due diligence process.

Kindly, provide us your bank's last three years Annual Reports copies and provisional Balance sheet and Profit & loss accounts alongwith NPA statement as on 31.03.2026 on our e-mail ID: sunitapatil@dnsb.co.in & planopr@dnsb.co.in by keeping CC to vishramdixit@dnsb.co.in

Please treat the matter as urgent.

Thanking you.

With Warm regards,

Mrs. Sunita Patil
Chief Operations Officer


## पान १ वरून...

### महिला आरक्षण कायद्यातील सुधारणा

करणार असून, या मनमानी निर्णयाविरोधात एकत्रित लढा दिला जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. निवडणूक आचारसंहितेचे उल्लंघन होत असतानाही निवडणूक आयोग गप्प असल्याबद्दल खर्गे यांनी खेद व्यक्त केला. सध्याचा निवडणूक आयोग म्हणजे गृह मंत्रालयाचे उप-कार्यालय असल्यासारखे काम करत असल्याची बोचरी टीका त्यांनी केली. संसदीय कामकाज मंत्र्यांना पत्र लिहून सर्वपक्षीय बैठक बोलावण्याची विनंती केली होती, परंतु सरकारने ती फेटाळून लावत आपला अजेंडा रेटण्याचा प्रयत्न केला आहे, असा आरोप त्यांनी बैठकीत केला.

-------------

### अवघ्या १५ दिवसात जमीन

शेतकऱ्यांना थेट शेताच्या बांधापर्यंत पोहोचणे सोपे होईल, असे त्यांनी स्पष्ट केले. शेती मोजणी प्रक्रिया अधिक सुलभ करण्यासाठी प्रशासनाने काही निर्णय घेतले आहेत. पोट विषयाची मोजणी केवळ २०० रुपयांत केली जाणार असून पट्टेवाटपाची नोंदणी फक्त १ हजार रुपयांत करण्याची सोय उपलब्ध केली जाणार आहे. पुढील दोन वर्षांत मोजणीची प्रक्रिया अधिक वेगवान करण्यावर भर दिला जाणार आहे.

---------

### ठाकरेंच्या ८ खासदारांसोबत

ठाकरेंचे आठ खासदार उपस्थित होते, अशी माहिती आहे. विशेष म्हणजे, एकनाथ शिंदे यांचा ताफा मार्ग बदलून ठाण्यातील व्होल्टास परिसरात गेल्याचेही वृत्त आहे. रात्री उशिरा सुरू झालेली ही बैठक पहाटेपर्यंत चालल्याचे सांगितले जात आहे. या बैठकीला खासदार श्रीकांत शिंदेही उपस्थित असल्याची माहिती समोर आली आहे. ठाकरे गटाकडून या बैठकीत अरविंद सावंत, संजय दिना पाटील, संजय देशमुख, नागेश पाटील आष्टीकर, भाऊसाहेब वाकचौरे आणि राजाभाऊ वाजे उपस्थित असल्याचे वृत्त आहे. तर ओमराजे निंबाळकर यांच्यासह आणखी दोन खासदार व्हिडीओ कॉलद्वारे सहभागी झाल्याची चर्चा आहे. या बैठकीत संबंधित खासदारांना शिंदे गटात येण्याची ऑफर देण्यात आल्याचेही सांगितले जात आहे. मात्र, या सर्व दाव्यांना ठाकरे गटातील काही खासदारांनी स्पष्ट नकार दिला आहे. अरविंद सावंत यांनी आपण कोणत्याही परिस्थितीत शिंदे गटात जाणार नसल्याचे ठामपणे सांगितले. तर ओमराजे निंबाळकर यांनीही अशी कोणतीही बैठक झाल्याचे फेटाळून लावत, ''जर बैठक झाली असेल तर त्याचे पुरावे द्यावेत,'' असे आव्हान दिले आहे.

-----------

### आता युपीआय पेमेंट होण्यासाठी

जर एखादा व्यक्ती 'व्हाईटलिस्ट'मध्ये असेल, म्हणजेच विश्वासार्ह संपर्क असेल, तर त्याला पैसे पाठवताना उशीर होणार नाही. तसेच व्यापाऱ्यांना केलेले पेमेंट, ई-मँडेट, चेक व्यवहारांवर हा नियम लागू होणार नाही. आरबीआय 'किल स्विच' नावाचे एक नवीन फीचर आणण्याचाही विचार करत आहे. याच्या मदतीने ग्राहक आपले सर्व डिजिटल पेमेंट्स तात्काळ बंद करू शकतील, ज्यामुळे फसवणूक टाळता येईल. दरम्यान, ८ मे २०२६ पर्यंत यावर सूचना मागवण्यात आल्या आहेत. त्यानंतर अंतिम मार्गदर्शक सूचना जाहीर केल्या जातील. एकूणच, या बदलांचा उद्देश डिजिटल व्यवहार अधिक सुरक्षित बनवणे आणि फसवणुकीवर आळा घालणे हा आहे.

**ज्येष्ठ नागरिकांना विश्वासार्ह व्यक्तीची परवानगी आवश्यक**

७० वर्षांपेक्षा जास्त वयाच्या नागरिकांसाठी विशेष तरतूद करण्यात आली आहे. ५०,००० रुपयांपेक्षा जास्त व्यवहार करण्यासाठी त्यांना विश्वासार्ह व्यक्तीची परवानगी आवश्यक असेल. तसेच एखाद्या खात्यात २५ लाख रुपयांपेक्षा जास्त रक्कम जमा झाल्यास, बँक त्या व्यवहाराची खात्री करूनच पुढील प्रक्रिया करेल.

----------

### ...तर संतोष देशमुख

विरोधात गुन्हा दाखल केला होता. त्यानंतर खिंडकर यांना तुरुंगात राहावं लागलं होतं. दादासाहेब खिंडकर म्हणाले की, ''मला फसवण्यात आलेला हा जुना व्हिडीओ आहे. हे सगळे लोक पैसे घेतात, नशा करतात आणि खोटे गुन्हे दाखल करतात. सरपंच संतोष देशमुखांची हत्या झाली, ते प्रकरण दाबण्यासाठी या प्रकरणाचा वापर करण्यात आला. याच लोकांनी गावातल्या अनेक लोकांवर असे खोटे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. याच आरोपींनी अनेक लोकांना मारहाण केली, परंतु त्यांच्यावर कोणताही गुन्हा दाखल करण्यात येत नाही. आपण तुरुंगात असताना आपल्यावर ज्यांनी खोटा गुन्हा दाखल केला त्यांनी धनंजय देशमुखांना एक प्रस्ताव दिला. दादासाहेब खिंडकरला सोडवायचं असेल तर संतोष देशमुख हत्या प्रकरणाची तक्रार मागे घ्या, असा प्रस्ताव धनंजय देशमुखांना देण्यात आला होता. आपल्यावर ज्यांनी खोटा गुन्हा दाखल केला त्यांच्यामागे मोठी राजकीय शक्ती असल्याचा दावा दादासाहेब खिंडकर यांनी यावेळी केला.

------------

### सीएम साहेब डीएमला मंत्री करा!

प्रसंगी दोघेही एकत्र आले. एकत्रच नव्हे तर व्यासपीठावर एकमेकांशेजारी बसले. दोघांमध्ये गप्पाही झाल्या. आता त्या गप्पा काय झाल्या, हे कोणालाही ठाऊक नाही. मात्र त्यावरून वेगळी राळ उठली गेली. आमदार धस यांनी आतापर्यंत केलेला विरोध विसरले की काय ? तर दुसरीकडे एवढे मोठा आरोप होऊनही धनंजय मुंडे धस यांच्यासोबत बोललेच कसे काय.? अशीही चर्चा सुरू झाली. हा विषय सर्वत्र चर्चेला गेला, मात्र मुख्यमंत्र्यांच्या भाषणापूर्वी पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे या संबोधित करत असताना, त्यांनी मात्र या धस - मुंडे यांच्यातील चर्चा जगजाहीर करून टाकली. बोलतानाच त्या म्हणाल्या की, आमचे बंधू धनंजय मुंडे आणि आमदार सुरेश धस यांच्यात सुरू असलेली चर्चा आणि ही चर्चा ऐकणारे माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर असाही उल्लेख त्यांनी व्यासपीठावरील उपस्थित असणाऱ्या व्यक्तींचा उल्लेख करताना केला. मी महिला आहे त्यामुळे माझे कान सर्वत्र असतात, असे देखील त्या म्हणाल्या. त्यामुळे माजी मंत्री धनंजय मुंडे, आमदार सुरेश धस या दोघांतील चर्चा अनेकांनी पाहिली, ऐकली पण माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर या दोघांची चर्चा ऐकत होते हे पंकजा मुंडे यांच्या भाषणानंतर सर्वांना कळाले आणि त्यानंतर ते फोटो व्हायरल होऊ लागले. या कार्यक्रमामधून एकच लक्षात येते जनतेची भावना आहे की, डीएम म्हणजेच धनंजय मुंडे यांना मंत्रिमंडळात घ्यावे. ती भावना जनतेने थेट मुख्यमंत्र्याच्या पायी घातली तर दुसरीकडे पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी मात्र आपल्या बंधूसह दोन्ही अन्नाकडे लक्ष ठेवले आणि ते आवर्जून जनतेला सांगितले हे विशेष.

## जाहीरनामा

जन्म मृत्यू नोंदणी प्रमाणपत्र मिळणे बाबत.
जन्म आणि मृत्यू ची नोंदणी (सुधारणा) कायदा २०२३
मधील कलम ११(३) अन्वये

सर्व जनतेस मौने खडकत ता. आष्टी. जि. बीड यांना जाहीर केले जाते कि, अर्जदार, नामे, कल्याण बाबागौर गोसावी रा. आष्टी ता. आष्टी जि.बीड यांनी त्यांचे स्वतःचे नामे, कल्याण बाबागीर गोसावी रा. खडकत ता. आष्टी जि.बीड याची जन्म दि. १८/०६/१९४४ रोजी मौजे. खडकत ता. आष्टी जि. बीड येथे झाला असून अर्जदारास सदरहू जन्म ची कायदेशीर नोंद असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळावे म्हणून या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे.

करीता सदरहू अर्जदाराचे यांची स्वतः यांचे कायदेशीर जन्म दिनांक कायदेशीर नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे प्रसिद्धी तारखेपासून १५ दिवसाच्या आत त्याने ह्या कार्यालयात हजर राहून आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरच असे कळविण्यात येते कि, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखवल्या तर सदर कार्यालय सदरहु अर्जदार ह्यांच्या हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क शाबीत झाल्यास त्यांना सदरहू जन्म नोंद कायदेशीर असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.१०/०४/२०२६ रोजी माझे सही व शिक्क्यानिशी दिला.

**आदेशावरून**
**स्वाक्षरीत/-**
**कार्यकारी दंडाधिकारी तथा**
**तहसिलदार, आष्टी**

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
शनिवार, दि.११ एप्रिल २०२६



## थोडक्यात

### संविधान एकता युवा मंचतर्फे केजमध्ये भव्य भिम जन्मोत्सव कार्यक्रमांचे आयोजन

केज । प्रतिनिधी

संविधान एकता युवा मंच, कानडी रोड केज यांच्या वतीने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त विविध सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या निमित्ताने विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव निर्माण व्हावी या उद्देशाने शालेय प्राथमिक व माध्यमिक गटासाठी निबंध स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, वकृत्व स्पर्धा, तसेच गीत गायन स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. यासोबतच वस्तीगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात येणार आहे.

कार्यक्रमाच्या अनुषंगाने दि. १२ एप्रिल (रविवार) रोजी विद्रोही कवी हेमंत सौंदरमल प्रस्तुत परिवर्तनवादी भिमगीतांचा ''पहाट परिवर्तनाची'' हा विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. त्यानंतर दि. १३ एप्रिल (सोमवार) रोजी ''आवाज आपल्या कलाकारांचा'' या सदाबहार फिल्मी व सुप्रसिद्ध भिमगीतांचा बहारदार कार्यक्रम सादर होणार आहे.

दि. १४ एप्रिल रोजी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त प्रतिमा पूजन, पंचशील ध्वजारोहण तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनचरित्रावर विचारमंथनाचा कार्यक्रम होणार आहे. यावेळी डॉ. ऋतुजा मुंडे या प्रमुख व्याख्याता म्हणून उपस्थित राहणार आहेत. या भव्य कार्यक्रमाला केज व तालुक्यातील राजकीय, सामाजिक क्षेत्रातील मान्यवर, दलित चळवळीतील कार्यकर्ते, तसेच पत्रकार बांधव मोठ्या संख्येने उपस्थित राहणार असल्याची माहिती आयोजकांकडून देण्यात आली आहे.विषेश म्हणजे स्नेहभोजणाचे ही नियोजन असल्याने सर्व मित्रपरीवारास आग्रहाचे निमंत्रण संविधान एकता युवा मंच, संयोजक समिती कडून देण्यात आले आहे.

### गणेश उबाळे यांची प्रदेश सरचिटणीसपदी निवड

बीड । प्रतिनिधी



महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसची विस्तारित प्रदेश कार्यकारणी मुंबई येथील प्रदेश कार्यालयातून प्रदेशाध्यक्ष शिवराज मोरे यांच्या हस्ते जाहीर करण्यात आली. या नव्या कार्यकारणीत गेवराईचेगणेश उबाळे यांची प्रदेश सरचिटणीस पदी निवड करण्यात आली.

महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसच्या या विस्तारित प्रदेश कार्यकारणीत, उपाध्यक्ष, सरचिटणीस, व सचिव अशा तब्बल १२४ पदाधिकाऱ्यांचा समावेश करण्यात आला आहे. या कार्यकारणीत गेवराई तालुक्यातील गणेश उबाळे यांना महत्वाच्या अश्या प्रदेश सरचिटणीस पदावर जबाबदारी मिळाल्याने जिल्ह्याच्या राजकीय वर्तुळात समाधान व्यक्त होत आहे. गणेश उबाळे यांनी यापूर्वी युवक काँग्रेसमध्ये सचिव पदावर म्हणून यशस्वीपणे काम केले असून आता प्रदेश सरचिटणीसमाध्यमातून त्यांच्यावर आणखी मोठी जबाबदारी सोपविण्यात आली आहे. गेवराईतालुक्यातील भेंड खुर्द येथील रहिवासी असलेल्या गणेश उबाळे यांनी आपल्या स्वकर्तृत्वावर संघटनेत ठसा उमटवला आहे. या नियुक्तीबद्दल बोलताना गणेश उबाळे यांनी सांगितले की, वरिष्ठ नेतृत्वाने त्यांच्यावर दाखवलेला विश्वास ते निश्चितच सार्थ ठरवतील व संघटनेला अधिक बळकटी देण्यासाठी प्रामाणिकपणे कार्य करतील. यावेळी त्यांनी माजी खासदार रजनी ताई पाटील, प्रदेशाध्यक्ष शिवराज मोरे, राष्ट्रीय सरचिटणीस तथा महाराष्ट्र प्रभारी अजय छिकारा, सहप्रभारी नवजोत सिंग संधू, तसेच महाराष्ट्र काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस आदित्य पाटील, बीड जिल्हा काँग्रेस कमिटीचे जिल्हाध्यक्ष राहूल सोनवणे तसेच सर्व नेत्यांचे आभारमानले. गणेश उबाळे यांच्या निवडीमुळे बीड जिल्हा युवक काँग्रेसमध्ये नवचैतन्य निर्माण झाले असून युवक काँग्रेसच्या कार्याला अधिक गती मिळेल, असा विश्वास पदाधिकारी यांच्या कडून व्यक्त केला जात आहे.

# ऊस बिल थकविणाऱ्या कारखान्यांवर कारवाईचा बडगा; १३ एप्रिलला साखर आयुक्तालयात सुनावणी

## भाई थावरे यांच्या मागणीची दखल; थकीत कारखान्यांवर आरआरसी निर्गमित करण्याचे आदेश

माजलगाव । प्रतिनिधी

ऊस (नियंत्रण) आदेश १९६६ नुसार शेतकऱ्यांना एफआरपीप्रमाणे ऊसाचे बिल १४ दिवसांत देणे बंधनकारक असताना, बीड जिल्ह्यात अनेक साखर कारखान्यांकडून याकडे दुर्लक्ष होत असल्याचा मुद्दा शेतकरी नेते भाई (गंगाभिषण) थावरे यांनी ठामपणे मांडला होता. त्यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला अखेर यश मिळत साखर विभागाने या प्रकरणाची गंभीर दखल घेतली आहे.

थावरे यांनी थकीत ऊस बिलांबाबत आवाज उठवत कारखान्यांविरोधात कठोर कारवाईची मागणी केली होती. त्यांच्या या मागणीच्या पार्श्वभूमीवर साखर संचालकांनी राज्यातील थकीत कारखान्यांविरोधात आरआरसी (जबर वसुली) निर्गमित करण्याचे आदेश दिले आहेत.

हंगाम २०२५-२६ मध्ये गाळप केलेल्या ऊस पुरवठादार शेतकऱ्यांचे सुमारे १२५९९.२९ लाख रुपये इतके एफआरपी देयक ३१ मार्च २०२६ अखेर थकीत असल्याचे स्पष्ट झाले आहे. नियमानुसार १४ दिवसांत देयके अदा न केल्यास १५ टक्के दराने व्याज आकारण्याची तरतूद असूनही अनेक कारखाने नियमांचे उल्लंघन करत असल्याचे थावरे यांनी निदर्शनास आणून दिले होते.

या प्रकरणी संबंधित कारखान्यांविरुद्ध आरआरसी कारवाई का करू नये, याबाबत सोमवार, १३ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ११.३० वाजता पुणे येथील साखर आयुक्तालयात सुनावणी निश्चित करण्यात आली आहे. सुनावणीस कारखान्यांच्या साखर साठ्याची माहिती, बँकेकडे असलेली तारण स्थिती तसेच जंगम व स्थावर मालमत्तेचा तपशील सादर करणे बंधनकारक करण्यात आले आहे. कार्यकारी संचालकांनी स्वतः उपस्थित राहून लेखी म्हणणे मांडण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. अन्यथा ऊस (नियंत्रण) आदेश १९६६ मधील तरतुदीनुसार कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही साखर संचालक यशवंत गिरी यांनी दिला आहे.

## सानप यांची पोलीस निरीक्षकपदी निवड झाल्याबद्दल मातृभूमी प्रतिष्ठानकडून सन्मान

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्हा वाहतूक शाखेचे प्रमुख कर्तव्यदक्ष पोलीस अधिकारी सुभाष बाळासाहेब सानप यांची सहाय्यक पोलीस निरीक्षक पदावरून पदोन्नतीने नाशिक ग्रामीण विभागात पोलीस निरीक्षक पदी १० एप्रिल २०२६ शुक्रवार रोजी निवड झाली आहे. शिरूर तालुक्यातील मौजे रायमोह येथील मातीत वाढलेले भूमिपुत्र सुभाष सानप यांची प्रथम सोलापूर शहर पोलीस ठाण्यात पोलीस उपनिरीक्षक पदी नियुक्ती झाली. सोलापूर जिल्ह्यात विविध ठिकाणी उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल तात्कालीन पोलीस अधीक्षक यांच्या शिफारशीने दै. लोकमतचा राज्यस्तरीय पुरस्काराने त्यांना सन्मानित करण्यात आले. त्यानंतर त्यांची बीड येथे बदली झाली. बीड नंतर जालना जिल्ह्यात वाहतूक शाखेत त्यांची बदली झाली.जालना येथील उल्लेखनीय कामगिरी केल्यानंतर त्यांची बीड येथील जिल्हा वाहतूक शाखेचे



प्रमुख म्हणून जबाबदारी देण्यात आली. जबाबदारी दिल्यानंतर सुभाष सानप यांनी विश्वास सार्थक ठरवत जिल्ह्यात काम करताना बेशिस्त वाहनचालकांना शिस्त लावण्या सोबतच गुटखा, वाळू तस्करांवर मोठ्या कारवाया केल्या. बीडच्या इतिहासात सुभाष सानप यांच्या नेतृत्वाखाली दुचाकींवर रेकॉर्डब्रेक कारवाईची देखील नोंद झाली आहे. सानप यांनी जिल्हाभर मोहीम राबवून कोट्यावधींचा दंड वसूल केला व बुलेट गाडीचा ठो ठो आवाज काढणाऱ्या बुलेट वाहन चालकाच्या बुलेट सायलेन्सर ५०० च्यावर जप्त करून वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली बुलडोझर खाली रिबीट तथा नाहीश्या करण्यात आल्या.चालकांना शिस्त लागावी व अपघात थांबावेत यासाठी जिल्ह्यातील २८ अपघात प्रवण स्थळांना भेटी देऊन तेथे जनजागृती करत अपघाताची संख्या त्यांनी कमी केली कठोर पण प्रवासांच्या जीवासाठी तळमळनारा पोलीस अधिकारी म्हणून ते सर्वांचे परिचित झाले होते. आता त्यांना पोलीस निरीक्षक पदी पदोन्नती मिळाली असून नाशिक ग्रामीणमध्ये पोलीस निरीक्षक पदी निवड झाल्याबद्दल बीड जिल्हा वाहतूक शाखा व मातृभूमी प्रतिष्ठानच्या वतीने जिल्हा जिल्हा वाहतूक शाखेचे पोलीस उपनिरीक्षक विजय जाधवर व मातृभूमी प्रतिष्ठानचे अध्यक्ष तथा पोलीस दलाचे योग व वेलनेस मास्टर ट्रेनर डॉ.संजय तांदळे यांच्या हस्ते त्यांचा जिल्हा वाहतूक शाखेत दिनांक १० एप्रिल २०२६ शुक्रवार रोजी शाल,पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सहृदयी सन्मान करण्यात आला यावेळी पोलीस उपनिरीक्षक वसुदेव मिसाळ, दै. राज्य लोकतंत्रचे उपसंपादक तथा मराठी पत्रकार परिषदेचे जिल्हाध्यक्ष विशाल साळुंके, पोलीस अंमलदार सखाराम घोलप,अजिनाथ मुंडे नितीन शिंदे ,संतोष हरके आदींची उपस्थिती होती.

पान ६ वरुन...

### माजलगावमध्ये पत्रकारास

केली. यावेळी आरोपींनी फिर्यादीच्या डोक्यात वीट मारून त्यांना जखमी केले. तसेच त्यांच्या खिशातील सुमारे ११ हजार रुपये रोख रक्कम जबरदस्तीने काढून घेतले.याशिवाय, आरोपींनी फिर्यादीस जीवे मारण्याची धमकी दिल्याचेही तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. या प्रकरणी माजलगाव शहर पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता (इछड) २०२३ अंतर्गत कलम ११८(१), ११९(१), ११५(२), ३५१(२), ३५२ व ३(५) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक केरबा माकणे करत आहेत.

### साडे नऊ लाखांच्या मुद्देमालासह

केला आहे. या प्रकरणी चालक सुखदेव सुभाष गायके (वय ३१ वर्ष, रा. धारूर, जि. बीड) याला ताब्यात घेण्यात आले आहे. या प्रकरणी नेकणूर पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक १४०/२०२६, कलम १२४ म.पो.अधि. अन्वये गुन्हा नोंदवण्यात आला आहे. पुढील तपास नेकणूर पोलीस करत आहेत. सदर कारवाई पोलीस अधीक्षक श्री. नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक श्रीमती चेतना तिडके, आणि स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. या पथकात पोलीस उपनिरीक्षक श्रीराम खटावकर, हवालदार अशोक दुबाले, सोमनाथ गायकवाड, आशपाक सय्यद, मनोज परजणे, सिद्धेश्वर मांजरे आणि विकास राठोड यांचा समावेश होता.

### बाबा आमटे साहित्यनगरी

'ग्रामीण भागातील शाळेची पटपडताळणी' ही विनोदी कथा सादर करत उपस्थितांना खळखळून हसवले. त्यांच्या सादरीकरणाला रसिकांनी तुफान दाद दिली.पुढे बबन आव्हाड (परभणी), स्वाती कान्हेगावकर आणि गोरक्ष शेंद्रे यांनीही आपापल्या कथांद्वारे विविध सामाजिक विषयांना स्पर्श करत कार्यक्रमाची रंगत वाढवली. संपूर्ण कार्यक्रमाचे सुत्रसंचालन आप्पासाहेब तांबे यांनी समर्थपणे केले. कथाकथनाच्या या सत्राला साहित्यप्रेमींची मोठी उपस्थिती लाभली असून बाबा आमटे साहित्यनगरीत साहित्यिक वातावरण अधिकच रंगतदार झाले आहे.

### शासनाच्या योजना फक्त

मदत केल्यास कोणताही शेतकरी योजनांपासून वंचित राहणार नाही. तहसीलदार वैशाली पाटील यांनी शेतकऱ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की,पीक पाहणी करणे अत्यावश्यक आहे.फार्मर आयडी काढणे बंधनकारक असून त्याशिवाय अनेक योजनांचा लाभ मिळणार नाही.नुकसान भरपाईपासून वंचित राहिलेल्या शेतकऱ्यांनी त्वरित कागदपत्रे सादर करावीत''योग्य माहिती व कागदपत्रे दिल्यास कोणत्याही पात्र लाभार्थ्याला वंचित ठेवले जाणार नाही,'' असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. कार्यक्रमाचे अध्यक्ष आटोळे यांनी मुद्रांक शुल्क विभागाच्या महत्त्वाच्या योजनेची माहिती देताना सांगितले की,

वडिलोपार्जित मालमत्तेचे वाटप पत्र केवळ १०० रुपयांच्या स्टॅम्प ड्युटीवर करता येते.

ही योजना ग्रामीण भागातील नागरिकांसाठी मोठा दिलासा ठरणार आहे.नागरिकांनी या योजनेची माहिती घेऊन त्याचा लाभ घ्यावा,असे आवाहन त्यांनी केले. टाकळसिंगची प्रगती: शेतीसोबत दुग्धव्यवसायात भरारी माजी सभापती बद्रीनाथ जगताप यांनी गावाच्या प्रगतीचा आढावा घेताना सांगितले की, टाकळसिंग गावात मोठ्या प्रमाणावर फळबाग शेती विकसित झाली आहे.दुग्ध व्यवसायाला मोठी चालना मिळाली असून दररोज सुमारे १० हजार लिटर दूध संकलित होत आहे.असे त्यांनी सांगीतले.

शिबिरात नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर तक्रारी मांडल्या यामध्ये शेतरस्त्यांचे अतिक्रमण, जमिनीची मोजणी व सीमावाद, विविध योजनांमध्ये विलंब आदी तक्रारी केल्या.तक्रारीचे निवारण करण्याचे प्रशासनाने आश्वासन दिले. यावेळी मोठ्या प्रमाणावर नागरिक प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते.

### पाटोदा तालुक्यातील समविचारी

शेतकरी संघटना इ. पक्षांनी सहभाग घेऊन, आंदोलन यशस्वी करण्यासाठी मेहनत घेतली होती, दि. ०९ एप्रिल २०२६ रोजी च्या धरने आंदोलनातील सर्व मागण्यांचे संदर्भात पुढील कार्यवाही केली असल्याचे लेखी पत्र घेतल्यानंतर हे धरने आंदोलन सर्व समविचारी पक्षांचे वतीने सोडण्यात आले, त्यावेळी भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे नेते कॉम्रेड महादेव नागरगोजे, भारतीय शेतकरी कामगार पक्षाचे नेते भाई विष्णुपंत घोलप, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (श.प.) चे जिल्हा सरचिटणीस शिवभुषण जाधव, भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे जिल्हा चिटणीस अँड विशाल मस्के, वंचित बहुजन आघाडी चे जिल्हा उपाध्यक्ष सचिन मेघडंबर, जनशक्ती शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र खाडे, भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे तालुका अध्यक्ष राहुल जाधव, शिवसेना (उ.बा.ठा. ) चे तालुकाध्यक्ष मुकुंद शिंदे, वंचित बहुजन आघाडी चे तालुकाध्यक्ष बाळासाहेब गायकवाड, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी श प चे तालुका कार्याध्यक्ष गणेश कवडे, सामाजिक कार्यकर्त्या रामकुवर नागरगोजे यांसह तालुक्यातील शेतकरी, कार्यकर्ते व जनतेचा मोठा समुदाय उपस्थित होता.

### आज काँग्रेसच्या वतीने संघटन

जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे यांच्या उपस्थितीत बैठक आयोजित केली आहे. अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या निर्देशानुसार ''संघटन सृजन अभियान'' अंर्तगत मा. तालुकाध्यक्ष, शहराध्यक्ष, विविध सेल अध्यक्ष, महिला काँग्रेस इ.च्या निवडीं संर्दभात या बैठकीत निर्णय घेण्यात येणार आहेत. दि. ११. ०४. २०२६ शनिवार रोजी सकाळी ११ वाजता शासकीय विश्रामगृह गेवराई येथे होणाऱ्या अखिल भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने संघटन सृजन अभियान हाती घेतले असून, महाराष्ट्रात हे अभियान पक्षाला तळागाळापर्यंत मजबूत करण्यासाठी एक महत्त्वपूर्ण पाऊल ठरणार आहे. तसेच गेवराई तालुक्यातील अखिल भारतीय काँग्रेस कमिटीची आढावा बैठक व पदाधिकारी निवड संदर्भात बैठक होणार आहे. तरी गेवराई तालुक्यातील काँग्रेस सर्व पदाधिकारी यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन काँग्रेस कमिटीचे तालुकाध्यक्ष महेश बेदरे यांनी केले आहे.

## महालक्ष्मी देवीच्या मूर्तीची स्थापना सारिका क्षीरसागर यांची उपस्थिती

बीड । प्रतिनिधी

शहरातील प्रकाश आंबेडकर नगर परिसरात असलेल्या महालक्ष्मी देवीच्या मंदिरात प्राणप्रतिष्ठेनिमित्त नगरसेविका सारिका ताई क्षीरसागर यांच्या उपस्थितीत देवीची विधिवत पूजा करून मूर्तीची प्राणप्रतिष्ठापना करण्यात आली. यावेळी भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शहरात होणाऱ्या विविध कार्यक्रमाला सर्वसमावेशक नेत्या सारिका ताई शिरसागर यांची उपस्थिती लागत असते त्याचप्रमाणे महालक्ष्मी देवी मंदिरात प्राणप्रतिष्ठा स्थापनेनिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते या कार्यक्रमाला सारिका ताई क्षीरसागर यांची प्रमुख उपस्थिती



होती यावेळी देवीची विधिवत पूजा करून देवीच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठापना करण्यात आली. यावेळी गोरख काळे, सुनील गायकवाड, सातेराम ढोले, शिवाजी अंकुशे, प्रभू हातागळे, बळी अंकुशे, मच्छिंद्र काळे, किरण काळे, तानाजी काळे, ऋषिकेश रोकडे, किरण काळे, आकाश काळे, सह प्रकाश आंबेडकर नगर मधील भाविक भक्त व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## आष्टीत महात्मा ज्योतिबा फुले जयंती उत्सव समितीच्या वतीने रक्तदान शिबिर

आष्टी । प्रतिनिधी

सार्वजनिक महात्मा फुले जयंती उत्सव आष्टी यांच्या वतीने क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले व विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त आयोजित करण्यात आलेल्या भव्य रक्तदान शिबिरास नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. सामाजिक बांधिलकी जपत आयोजित या उपक्रमात तब्बल १४८ रक्तदात्यांनी रक्तदान करून मानवतेचा संदेश दिला.या रक्तदान शिबिराचे आयोजन सार्वजनिक महात्मा फुले जयंती उत्सव समितीच्या वतीने करण्यात आले होते. सकाळपासूनच युवक, सामाजिक कार्यकर्ते, विविध संघटनांचे पदाधिकारी तसेच नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावत रक्तदानासारख्या पवित्र कार्यात सहभाग नोंदविला.कार्यक्रमाच्या प्रारंभी महात्मा ज्योतिराव फुले डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन व अभिवादन करण्यात आले. त्यानंतर उपस्थित मान्यवरांनी रक्तदानाचे महत्त्व सांगताना, रक्तदान हेच श्रेष्ठ दान असून अनेक गरजू रुग्णांना जीवनदान देणारे कार्य आहे, असे मत व्यक्त केले. रक्तपेढींमधील साठा कमी पडू लागला आहे. हीच गरज लक्षात घेऊन सामाजिक बांधिलकी राखत व तरुणांना रक्तदानाविषयी माहिती मिळावी हा उद्देश डोळ्यांसमोर ठेवून आष्टी शहरातील संत शिरोमणी सावता महाराज मंदीरात सार्वजनिक महात्मा ज्योतिबा फुले जयंती उत्सव समितीच्या वतीने क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले आणि भारतरत्न विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.दि.९ एप्रिल रोजी सकाळी ९ वाजता रक्तदान शिबिरास सुरूवात झाली १४८ रक्तदात्यांनी रक्तदान केले.शिबिरात सहभागी झालेल्या रक्तदात्यांचा आयोजकांच्या वतीने प्रशस्तीपत्र, गुलाबपुष्प व आकर्षक भेटवस्तू देऊन सन्मान करण्यात आला.अहिल्यानगर येथील सुरभी रक्तपेढीच्या वैद्यकीय पथकाने संपूर्ण प्रक्रियेत सहकार्य करत रक्तसंकलनाची जबाबदारी यशस्वीपणे पार पाडली.उपक्रमामुळे समाजात रक्तदानाबाबत जनजागृती निर्माण होऊन युवकांमध्ये सामाजिक उत्तरदायित्वाची भावना अधिक दृढ झाली, अशी भावना उपस्थितांनी व्यक्त केली.रक्तदात्यांना केळी, फ्रुटी देण्यात आली हे शिबीर यशस्वी करण्यासाठी सार्वजनिक महात्मा फुले जयंती उत्सव समितीच्या सदस्यांनी परिश्रम घेतले.मोठ्या संख्येने नागरिक, तरुण उपस्थित होते.

## 'सहकारातून समृद्धी' परिषदेत तेजस अर्बन क्रेडिट सोसायटीचा सन्मान



बीड । प्रतिनिधी

सकाळ मीडिया ग्रुप तर्फे आयोजित 'सहकारातून समृद्धी' कॉफी टेबल बुक प्रकाशन व सहकार परिषद उत्साहात पार पडली. सहकार क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मराठवाड्यातील ३२ पतसंस्थांचा यावेळी गौरव करण्यात आला.

यामध्ये तेजस अर्बन कॉपरेटिव क्रेडिट सोसायटी ली बीड या संस्थेचा विशेष सन्मान करण्यात आला. संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रकाश दादा कवठेकर यांनी मान्यवरांच्या हस्ते हा गौरव स्वीकारला.

ग्रामीण व शहरी भागातील आर्थिक उन्नतीसाठी पतसंस्थांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असून, छोट्या बचतीपासून ते मोठ्या उद्योगांपर्यंत आर्थिक आधार देत या संस्थांनी समाजाच्या विकासात मोठे योगदान दिले असल्याचे मत या परिषदेत व्यक्त करण्यात आले.

या कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती म्हणून महाराष्ट्र राज्याचे इतर मागासवर्ग, बहुजन कल्याण तसेच ऊर्जा विभागाचे मंत्री अतुल सावे, सहकार विभागाचे जिल्हा उपनिबंधक समृत जाधव, महाराष्ट्र राज्य पतसंस्था फेडरेशनचे उपाध्यक्ष डॉ.शांतीलाल सिंगी, तसेच महाराष्ट्र राज्य सहकार धोरण उच्चस्तरीय समितीचे सदस्य व सहकार भारती, महाराष्ट्र प्रदेशचे महामंत्री विवेक जुगडे व सकाळ वृत्तपत्राचे मराठवाडा विभागाचे संपादक संतोष शाळीग्राम यांची प्रमुख उपस्थिती होती. परिषदेत 'पतसंस्थांचा प्रवास : काल, आज आणि उद्या', 'सहकार क्षेत्रातील सरकारी धोरणे व दिशा' तसेच 'पतसंस्थांचे सुयोग्य व्यवस्थापन' या विषयांवर सखोल मार्गदर्शन करण्यात आले. हा कार्यक्रम सहकार क्षेत्राला नवी दिशा देणारा ठरला असून, पतसंस्थांच्या कार्याला प्रेरणा देणारा उपक्रम असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

## महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त सामाजिक सप्ताह संपन्न

**वडवणी । प्रतिनिधी**

डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त सिंधाफणा माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय वडवणी येथे सामाजिक सप्ताह कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे अध्यक्ष मुख्याध्यापक तथा प्रचार्य प्राचार्य भोसले सर हे होते.प्रमुख उपस्थितीत श्री लांडे सर, जाधवर सर ,व समता दूत महादेव तुरे होते. कार्यक्रमाची सुरुवात संविधान उद्देशिका वाचन करून करण्यात आली.व महामानव डॉ .बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्यास उजाळा शैक्षणिक सामाजिक राजनीतिक विषयावर बार्टीचे समता दूत महादेव तुरे सर यांनी माहिती दिली. अध्यक्ष भाषण शाळेचे मुख्याध्यापक तथा प्रचार्य भोसले सर यांनी केले . समतादूत महादेव तुरे बार्टी समाज कल्याण कार्यालय बीड वडवणी तालुका यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.आभार प्रदर्शन प्राध्यापक लांडे सर यांनी केले. डॉ.बाबासाहेब आंबेडकर व रमाई आंबेडकर गीत मुलींनी गायले व मुख्याध्यापक यांना संविधान उद्देशिका देण्यात आले व सत्कार करण्यात आला तसेच लांडे सर, जाधवर सर यांना संविधान उद्देशिका देण्यात आली ,प्रमुख पाहुणे यांनी चवदार महाडचा



चवदार तळ्याचे सविस्तर विद्यार्थ्यांना माहिती दिली. समाज कल्याण कार्यालयाचे योजनेची माहिती व डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था विभागाची माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली. या कार्यक्रमासाठी शाळेतील सर्व विद्यार्थी व शिक्षक कर्मचारी उपस्थित होते.

# आंबा, काजू उत्पादकांना बोगस आणि निकृष्ट खते

## शेतकऱ्यांना मोठा फटका, औषध कंपन्यांनवर गुन्हा दाखल करण्याची राजू शेट्टींची मागणी

पुणे/ प्रतिनिधी

कोकणातील आंबा व काजू उत्पादक शेतकऱ्यांना औषध कंपन्यांनी बोगस आणि निकृष्ट खते व किटकनाशके दिल्याने शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले आहे, त्यामुळं या सर्व औषध कंपन्यावर गुन्हे दाखल करून तातडीने शेतकऱ्यांना चुकीच्या औषध वापराने झालेली नुकसानभरपाई देण्यासंदर्भात कृषी आयुक्तांनी कारवाई करण्याची मागणी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे प्रमुख राजू शेट्टी यांनी केली आहे. पुण्यात कृषी आयुक्त कार्यालयात बैठक झाली. यामध्ये ही मागणी करण्यात आली आहे.

चालू वर्षी रत्नागिरी, सिंधुदुर्ग, रायगड, रत्नागिरी व पालघर जिल्ह्यात आंबा व काजू बागायतदार शेतकरी अस्मानी व सुलतानी संकटात सापडला आहे. औषध कंपन्यांच्या दरावर राज्य सरकारचे कोणतेही नियंत्रण नाही. रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यातील आंबा उत्पादक शेतकऱ्यांनी ३०० कोटी रुपयांची औषधे खरेदी केली आहेत. औषध कंपन्यांकडून खते , किटकनाशके , पीजीआर व बुरशीनाशकांचा वापर कोणत्या पध्दतीने करण्यात



यावा याबाबत माहिती न दिल्याने नुकसान झाले आहे. याच मुद्यावरुन स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे प्रमुख आणि माजी खासदार राजू शेट्टी आक्रमक झाले आहे. बोगस औषधे देणाऱ्या कंपन्यांवर गुन्हे दाखल करण्याची मागणी केली जात आहे. आंबा पिकासाठी जवळपास ७० हून अधिक कंपन्यांनी औषधांची विक्री केलेली आहे. सदर कंपन्याच्या औषधांच्या किमतीमध्ये तफावत असून शेतकऱ्यांनी

रोखीने औषध खरेदी केल्यास मुळ किमतीच्या ६० ते ६५ टक्के सवलत दिली जाते. गुण नियंत्रण विभागाकडून मोजक्याच कंपन्याच्या औषधांची तपासणी करण्यात येते यामुळे बोगस औषध कंपन्यांचा सुळसुळाट झाल्याचे राजू शेट्टी म्हणाले.

आंबा पिकासाठी जवळपास ७० हून अधिक कंपन्यांनी औषधांची विक्री केलेली आहे. सदर कंपन्याच्या औषधांच्या किमतीमध्ये तफावत असून

शेतकऱ्यांनी रोखीने औषध खरेदी केल्यास मुळ किमतीच्या ६० ते ६५ टक्के सवलत दिली जाते. गुण नियंत्रण विभागाकडून मोजक्याच कंपन्याच्या औषधांची तपासणी करण्यात येते यामुळे बोगस औषध कंपन्यांचा सुळसुळाट झाल्याचे राजू शेट्टी म्हणाले. यावेळी बोलताना माजी आमदार बाळा माने म्हणाले की, आंबा पिकांच्या किड रोगांच्या औषध फवारणी मध्ये संशोधन विभागाने नेमक काय संशोधन केले तसेच ज्या औषध कंपन्या बोगस आहेत त्यांच्यावर गुणनियंत्रण विभाग यांनी काय कारवाई केली. १९९० सालापासून गुणनियंत्रण विभाग व कृषी विद्यापीठाकडून फळ बाग लागवडीसाठी नाविन्यपूर्ण कोणतेच संशोधन करण्यात आले नाही असे ते म्हणाले. यावेळी संचालक गुण नियंत्रक सुनिल बोरकर , दापोली कृषी विद्यापीठाचे संशोधक अनिल देसाई ,स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे राज्य सचिव राजेंद्र गड्यान्नावर , गणेश गायकर , सुशांत नाईक , प्रशांत शिंदे औषध कंपन्यांचे प्रतिनिधी यांच्यासह रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यातील आंबा बागायतदार शेतकरी उपस्थित होते.

## छत्तीसगड राज्यातील बनावट कीटकनाशकांची महाराष्ट्रात विक्री ; शेतकऱ्यांचा धक्कादायक अनुभव



गोंदिया : पिकांच्या संरक्षणासाठी तणनाशकांचा मोठ्या प्रमाणावर वापर केला जात आहे. मात्र, याच संधीचा फायदा घेत छत्तीसगड राज्यातील काही कंपन्यांकडून बनावट कृषी औषध व तणनाशकांचा पुरवठा केला जात आहे. महागडी तणनाशके फवारूनही शेतातील तण नष्ट होत नसल्याने व उलट धानाची वाढ खुंटत असल्याने शेतकऱ्यांचे नुकसान होत आहे. असाच प्रकार गोरेगाव तालुक्यातील कुऱ्हाडी येथे उघडकीस आला आहे.

उन्हाळी धान पिकाची लागवड करण्यात आली असून, सध्या धान गर्भावस्थेत आहे. दरम्यान, शेतकऱ्यांकडून मजुरांची टंचाई आणि वेळ वाचवण्यासाठी तणनाशकांचा पर्याय निवडला जात आहे. मात्र, बाजारात कमी किमतीत उपलब्ध असलेल्या आणि छत्तीसगडमधील काही कंपन्यांच्या तणनाशकांचा वापर केल्यावर कोणताच परिणाम दिसून येत नाही. परिसरातील शेतकऱ्यांनी कृषी केंद्रातून पुनी सेट व अलमोक्स नावाचे तणनाशक खरेदी करून शेतात फवारले. मात्र, काही दिवसांतच त्यांना धक्कादायक अनुभव आता. तणाचा नायनाट होण्याऐवजी या औषधामुळे तणाची वाढ होत धानाची वाढ खुंटत असल्याचे दिसून आले. यावर त्यांनी कृषी केंद्र संचालक व संबंधित कंपनीच्या प्रतिनिधीशी संपर्क साधून घडलेल्या प्रकाराविषयी सांगितले. मात्र, कंपनीच्या प्रतिनिधीकडून त्यांना उडवाउडवीची उत्तरे देण्यात आली. त्यांनी गोरेगाव येथील तालुका कृषी अधिकाऱ्यांकडे तक्रार करून कारवाईची मागणी केली आहे.

## घरच्या घरी तयार करा निंबोळी अर्क

रासायनिक कीटकनाशकांच्या अतिरेकी वापरामुळे पिकांचे नुकसान, मातीच्या गुणवत्तेचा ऱ्हास, मानवी आरोग्यावर दुष्परिणाम आणि पर्यावरणीय संकटे या समस्या गंभीर बनल्या आहेत. यावर एक नैसर्गिक, प्रभावी व किफायतशीर उपाय म्हणजे निंबोळी अर्क. हे किटकनाशक घरच्या घरी तयार करता येते, तेही कोणताही अतिरिक्त खर्च न करता.निंबोळी अर्क म्हणजे काय? कडूनिंबाच्या पिकलेल्या फळांपासून तयार होणारा हा अर्क मावा, तुडतुडे, अमेरिकन बोंडअळी, पाने पोखरणारी व देठ कुरतडणारी अळी, फळमाशी, खोडकीडा इत्यादी किडींवर अत्यंत प्रभावी आहे. ५% प्रमाणात फवारणी केल्यास हे किड नियंत्रण सुनिश्चित करता येते.घरच्या घरी निंबोळी अर्क तयार करण्याची सोपी पद्धत : बांधावर किंवा रस्त्याच्या कडेला पडलेल्या पिकलेल्या निंबोळ्या गोळा करा. त्यातील साल व गर काढून फक्त बिया स्वच्छ धुवून सावलीत वाळवा. कोरड्या ठिकाणी साठवून ठेवा. या बिया खलबत्त्यात किंवा पल्वरायझरमध्ये बारीक करून ५ किलो पावडर तयार करा. ती ९ लिटर पाण्यात भिजवा. दुसऱ्या भांड्यात १ लिटर पाण्यात २०० ग्रॅम साबणाचा चुरा भिजत ठेवा. दुसऱ्या दिवशी निंबोळी अर्क कपड्यातून गाळा. त्यात साबणाचे द्रावण मिसळा. हे मिश्रण ९० लिटर पाण्यात मिसळून १०० लिटर फवारणीयोग्य द्रावण तयार करा.

फायदे : प्रभावी कीड नियंत्रण. अत्यल्प खर्च. सहज उपलब्ध व घरच्या घरी तयार करता येणारा उपाय. पर्यावरणपूरक आणि निसर्गाशी सुसंगत. उत्पादन खर्चात बचत, नफ्यात वाढ. निंबोळी अर्क फवारणीच्या दिवशीच तयार करावा. बाजारातील दर्जाहीन सेंद्रिय किटकनाशकांपेक्षा घरचा अर्क अधिक प्रभावी व सुरक्षित ठरतो. स्वतःच्या शेतात निंबोळी अर्क वापरून कीड नियंत्रण करा, पर्यावरणाचे रक्षण करा आणि शाश्वत शेतीचा मार्ग स्वीकारा.



## बीट लागवड तंत्रज्ञान

सॅलेड, सरबत, कोशिंबीर, चटणी, रक्त वाढीसाठी याची चांगले मदत होते. भारतात पंजाब, कर्नाटक, तमिळनाडू, राजस्थान, पश्चिम बंगाल व महाराष्ट्र या राज्यांमध्ये या पिकाची लागवड केली जाते. बाजारात याची चांगले मागणी आहे.

जमिनीचा प्रकार : बीटच्या लागवडीसाठी भुसभुशीत, पाण्याचा निचरा होणारी जमीन योग्य असते. तसेच भारी जमिनीत बीटाची लागवड केल्यास बीटाच्या मुळाचा आकार वाकडा होतो. या साठी जमिनीचा सामू हा ६ ते ७.५ असावा. तसेच ९ते १० सामू असणाऱ्या क्षारयुक्त जमिनीत बीटाची वाढ चांगले होते तसेच बीट ची महाराष्ट्रात खरीप हंगामात लागवड केली जाते.

हवामान : बीट हें थंड हवामानातील पीक असून या काळातील हवामान पोषक असते बीटची रब्बी हंगामात ऑक्टोबर मध्ये बी पेरणी केली जाते परंतु महाराष्टामध्ये जून व जुलै मध्ये बियांची पेरणी केली जाते.

पिकाची जात :डेट्राईट डार्क रेड, क्रीम्सन ग्लोब, अर्ली वंडर : लागवड : एक हेक्टरसाठी ७ ते १० किलो बियाणे लागते. बियाणांची लागवड पेरून किंवा टोकण पद्धतीने करावी. एका ठिकाणी २ बिया टोकून लागवड करावी बीटासाठी ४५ सेमी अंतरावर सरीवर करावी आणि सरी वरंबा १५ ते २० से मीटर अंतरावर बियाणे लागवड करावी. बियाणे उगवून आले की विरळणी करून एका ठिकाणी १ च रोप ठेवावे. तसेच बी लागवड करण्या पूर्वी बियाणे रात्रभर भिजत ठेवावे म्हणजे बियाणे चांगले उगवते. बियाणे जमिनीत लागवड



करण्यापूर्वी जमिनीत ओलावा असावा, बीट ची लागवड ३०-४५ बाय १५ ते २० सेमीटर अंतरावर करावी. खत व्यवस्थापन : लागवडीच्या वेळी १५ ते २० गाड्या शेणखत टाकावे ६० ते ७० किलो नत्र,१०० ते १२० किलो स्फुरद आणि ६० ते ७० किलो पालाश हेक्टरी दयावे. नत्राची अर्धी मात्रा व स्फुरद आणि पालाशची पूर्ण मात्रा बियांची लागवड करताना दयावी व नत्राची उरलेली अर्धी मात्रा ही पेरणी नंतर ४ ते ६ आठवडयांनी द्यावी.

पाणी व्यवस्थापन : कंद्याच्या चांगल्या वाढीसाठी पिकाला पाण्याचा भरपूर पुरवठा करावा.जमिनीत सतत ओलावा राहील याची काळजी घ्यावी. त्यामुळे उगवण चांगली होऊन पिकांची वाढ चांगली होते. पिक वाढीच्या काळात पाण्याची कमतरता पडू देऊ नये. रब्बी हंगामात पिकाला ८-१० दिवसांच्या अंतराने नियमित पाणी द्यावे.

रोग नियंत्रण : १) मावा :पानातील रस शोषण करतो त्यामुळे वेली निस्तेज होते पिकाची वाढ खुंटते. उपाय - टाटा माणिक - ८ ते १० ग्राम १५ लिटर च्या पंप ला घेऊन फवारणी करावी. अथवा निमार्क २५- ३० ग्राम १५ लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. २) तुडतुडे : पानातील रस शोषण करते. उपाय - अरेवा ८ ते १० ग्राम १५ लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी अथवा निमार्क २५ -३० ग्राम १५ लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. ३) सफेद माशी : पानातील रस शोषण करते. उपाय- उलाला ८ ते १० ग्राम १५ लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. ४) पाने खाणारी अळी व फळातील अळी : पाने खाते व फळाच्या आत मध्ये अळी तयार होते त्यामुळे फळ वाकडे होते. उपाय - निमार्क २५ -३० ग्राम १५ लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी व किडलेली फळे काढून टाकावी नंतर फवारणी करावी. ५) मर रोग : पाणी अतिजास्त दिलेल्या मुळे किंवा वातावरणातील बदलामुळे रोपाची मर होते. उपाय - पिकाच्या आवश्यक्ते नुसार पाणी दयावे तसेच रोपाच्या बुडा जवळ बुरशीनाशका चे ड्रिचिंगी करावे किंवा फवारणी करणे.उत्पादन : बिटाची काढणी ७० ते ७५ दिवसांनी करावी. बीटच्या कंदाची वाढ ३ ते ५ से मी झाली की हाताने उपटून करावी तसेच काढणी करताना मुळ्याना इजा होणार नाही याची काळजी घ्यावी. काढणी नंतर कंदाची प्रतवारी करावी तसेच कंद विक्रीला पाठवताना त्याची पाने काढून टाकावी व कंद स्वछ धुणे. पॅकिंग हें प्लास्टिक च्या पिशवीत केल्यास कंद जास्त काळ चांगले राहतात. तर ४ ते ६ जुड्या बांधून विक्रीस पाठवले जातात. याचे सरासरी उत्पादन हेक्टरी २० ते २५ टन इतकं मिळते.




### महत्वाच्या घटना

१६०६ : ग्रेट ब्रिटनने 'यूनियन जॅक'ला राष्ट्रीय ध्वज म्हणून मान्यता दिली.
१९६१ : रशियाचा युरी गागारिन हा अंतराळात भ्रमण करणारा पहिला मानव बनला. त्याने अंतराळात १०८ मिनिटे भ्रमण करुन पृथ्वीप्रदक्षिणा केली.
१९६१ : सोवियेत संघाचा युरी गागारिन अंतराळात जाणारा प्रथम माणूस झाला.
१९६७ : कैलाश नाथ वांछू यांनी भारताचे १० वे सरन्यायाधीश म्हणुन कार्यभार सांभाळला.
१९७८ : भारतातील मुंबई ते पुणे शहरादरम्यान पहिली डबल डेक्कर रेल्वे धावली.
१९९७ : पूर्व प्राथमिक प्रवेशाकरता पाल्य अथवा पालकांच्या मुलाखती घेण्यास मनाई करण्याची तरतूद असणारे विधेयक विधानसभेत मंजूर
१९९७ : भारतीय पंतप्रधान एच.डी. देवेगौडा यांचा राजीनामा.
१९९८ : गेल्या शतकातील साठच्या दशकात हरितक्रांती घडवून आणण्यात मोलाची कामगिरी बजावणारे सी. सुब्रम्हण्यम यांना 'भारतरत्न' हा सर्वोच्च नागरी सन्मान प्रदान
२००९ : झिम्बाब्वेने अधिकृतरीत्या झिम्बाब्वेचे डॉलर हे चलन सोडून दिले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

५९९ : जैनांचे २४ वे तीर्थंकर महावीर यांचा जन्म.
१३८२ : मेवाडचा महापराक्रमी राजा संग्रामसिंग ऊर्फ राणा संग चैत्र व. ९
१८७१ : वासुदेव आपटे - आनंद या लहान मुलांच्या मासिकाचे संस्थापक व संपादक.
१८८५ : महोजोदडोची शोध करणारे भारतीय पुरातत्व व संग्रहालय तज्ञ राखलदास बनर्जी यांचा जन्मदिन.
१९१० : पु.भा. भावे (पुरुषोत्तम भास्कर भावे) - मराठीतील प्रतिभासंपन्न लेखक.
१९१४ : कृष्ण गंगाधर दिक्षीत ऊर्फ कवी संजीव - 'सासरमाहेर', 'भाऊबीज', 'चाळ माझ्या पायांत' या चित्रपटांचे त्यांनी कथा, संवाद व गीतलेखन केले होते. (मृत्यू: २८ फेब्रुवारी १९९५)
१९१७ : विनू मांकड - सलामीचे फलंदाज व डावखुरे मंदगती गोलंदाज (मृत्यू: २१ ऑगस्ट १९७८)
१९३२ : लक्ष्मण कादिरमगार - श्रीलंकेचे परराष्ट्रमंत्री, मुत्सद्दी, वकील व तामिळ नेते (मृत्यू: १२ ऑगस्ट २००५)
१९३७ : साली भारतीय हिंदी चित्रपट क्षेत्रांतील सुप्रसिद्ध गीतकार व अभिनेते गुलशनकुमार मेहता यांचा जन्मदिन.
१९४३ : सुमित्रा महाजन - लोकसभा अध्यक्ष
१९५४ : सफदर हश्मी - मार्क्सवादी विचारसरणीचे पथनाट्यकार, लेखक, दिगदर्शक, कवि आणि गीतकार (मृत्यू: २ जानेवारी १९८९)
१९८१ : तुलसी गॅब्बार्ड, अमेरिकेच्या प्रतिनिधीगृहात निवड झालेली पहिली हिंदू व्यक्ती.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१२३६ : दिल्ली येथील सल्तनत सत्तेचे शासक सुलतान म्सउद्दीन इल्तुतमिश यांचे निधन.
१७२० : बाळाजी विश्वनाथ भट तथा पहिला पेशवा (जन्म: १ जानेवारी १६६२)
१८१७ : चार्ल्स मेसिअर - फ्रेन्च खगोलशास्त्रज्ञ (जन्म: २६ जून १७३०)
१९०६ : महामहोपाध्याय पण्डित महेशचंद्र 'न्यायरत्न' भट्टाचार्य (जन्म: २२ फेब्रुवारी १८३६)
१९४५ : फ्रँकलिन डी. रुझव्हेल्ट - अमेरिकेचे ३२ वे राष्ट्राध्यक्ष (जन्म: ३० जानेवारी १८८२)
२००१ : भारताच्या माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील एक अग्रणी व्यक्तिमत्त्व आणि नॅशनल असोसिएशन ऑफ सॉफ्टवेअर अँड सर्विस कंपनीज चे अध्यक्ष देवांग मेहता यांचे ऑस्ट्रेलियात निधन (जन्म: १० ऑगस्ट १९६०)
२००१ : पै. चंबा मुत्नाळ - हिंदकेसरी
२००१ : स्माईली चे जनक हार्वे बॉल यांचे निधन. (जन्म: १० जुलै १९२१)
२००६ : राजकुमार - कन्नड चित्रपट अभिनेता व गायक (जन्म: २४ एप्रिल १९२९).

## ओळखा नुकसान करणाऱ्या शेतातल्या निम्याटोडला अन् करा नियंत्रण

निम्याटोड हे डोळ्यांना न दिसणारे सूक्ष्म कृमी असतात. हे मातीमध्ये किंवा मुळांच्या पेशींमध्ये राहतात आणि तिथूनच झाडाचं अन्न शोषून घेतात. यामुळे झाडाला पोषणच मिळत नाही मग झाड पिवळं पडतं, वाढ खुंटते, आणि शेवटी पीक हातातून जाते. हे आहेत लक्षणे : पाणी असूनही झाडे ही रगळलेली दिसतात. पानं पिवळी पडतात. मुळ्यांवर गाठी तयार होतात. झाड वाढत नाही, फुलं येत नाहीत. उत्पादनात अचानक मोठी घट. जेव्हा खतं दिली, तरीही पीक उभं राहत नाही तेव्हा निम्याटोड असण्याची शक्यता नक्की समजा. क्या पिकांमध्ये असतो जास्त धोका : निम्याटोड जवळपास सर्वच पिकांमध्ये आढळतो, पण काही पिकांमध्ये तो अधिक घातक ठरतो. टोमॅटो, वांगी, मिरची, हरभरा, तूर, सोयाबीन, डाळिंब, केळी, संत्रा, कांदा, लसूण, गहू, फुलशेती- गुलाब, गेंदा, शेवंती.

कसा ओळखायचा? झाडांची वाढ थांबलेली दिसते. मुळं उकरून गाठी दिसतात का पाहा. माती नमुना प्रयोगशाळेत द्या. तज्ज्ञ सल्ला घ्या. नियंत्रणासाठी सेंद्रिय उपाय : निंबोळी पेंड- २०० ते ३०० किलो/एकर. ट्रायकोडर्मा, व्हर्टिसिलियम, पॅसिलोमायसिस- जैव नियंत्रणासाठी उपयोगी - गोमूत्र, जीवामृत, कंपोस्ट- मातीचे आरोग्य टिकवतात. प्रभावी उपाय : पिकांची फेरपालट- सतत एकाच प्रकारचं पीक टाळा. सोलरायझेशन- उन्हाळ्यात प्लास्टिक टाकून माती तापवा. सेंद्रिय खतांचा वापर वाढवा- मातीतील उपयुक्त सूक्ष्मजीव वाढवा. रासायनिक उपाय : तज्ज्ञांचा सल्ला घेवून फेनामायफॉस, कार्बोफ्युरॉन, क्लोरोपायरीफॉस.

राज्य लोकतंत्र
मराठवाडा वृत्तांत

# सर्वांना सोबत घेऊन काम करणार सीईओ कृष्णकांत कनवारिया

जालना । प्रतिनिधी

जिल्हा परिषदेमार्फत राबविण्यात येणाऱ्या केंद्र व राज्य शासनाच्या महत्त्वाकांक्षी योजनांची प्रभावी अंमलबजावणी सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना सोबत घेऊन तणावमुक्त वातावरणात काम करण्यात येईल, असा जिल्हा परिषदेचे नवनियुक्त मुख्य कार्यकारी अधिकारी कृष्णकांत कनवारिया यांनी व्यक्त केला. माजी मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू पी. एम. यांच्या जागी कृष्णकांत कनवारिया यांनी नुकताच पदभार स्वीकारला आहे. पदभार स्वीकारल्यानंतर त्यांनी आज जिल्हा परिषदेच्या विविध विभागांना भेट देऊन कामकाज व कर्मचारी यांचा आढावा घेतला. यावेळी त्यांनी संबंधित विभागप्रमुख, अधिकारी व कर्मचाऱ्यांशी संवाद साधत त्यांच्या अडचणी, सूचना व अपेक्षा जाणून घेतल्या.



कनवारिया म्हणाले की, जिल्हा परिषदेच्या माध्यमातून ग्रामीण भागाच्या विकासासाठी विविध योजना राबविल्या जातात. या योजनांची अंमलबजावणी करताना प्रशासन व कर्मचारी यांच्यात समन्वय, सुसंवाद व सकारात्मक दृष्टिकोन अत्यंत आवश्यक आहे. सर्वांनी एकत्रितपणे काम केल्यास उद्दिष्टे अधिक प्रभावीपणे साध्य करता येतात. तसेच, अधिकारी व कर्मचाऱ्यांवर अनावश्यक तणाव येऊ नये यासाठी कामाचे योग्य नियोजन, वेळेचे व्यवस्थापन व सुसंवाद यावर भर दिला जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. ''तणावमुक्त वातावरणात काम केल्यास कार्यक्षमता वाढते आणि नागरिकांना अधिक चांगल्या सेवा देता येतात,'' असेही त्यांनी नमूद केले. यावेळी त्यांनी विविध विभागांच्या प्रलंबित कामांचा आढावा घेत असल्याची माहिती दिली. शासनाच्या योजनांचा लाभ पात्र लाभार्थ्यांपर्यंत वेळेत पोहोचविण्यासाठी सर्वांनी जबाबदारीने व समन्वयाने काम करून जिल्ह्याला विविध योजनांमध्ये अग्रक्रमांक मिळवून देऊ, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. शिक्षण, आरोग्य, स्वच्छता अभियान, महिला व बाल कल्याण विभाग, मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान आदींसह सर्वच विभागांमध्ये अधिक जोमाने काम केले जाईल, असेही त्यांनी सांगितले. यावेळी जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी राजेंद्र तुबाकले उपस्थित होते.

# दुसऱ्या लग्नाचा राग मनात धरून लग्नाच्या दिवशीच मुलानी केला वडीलाचा खून

अंबड। प्रतिनिधी

अंबड तालुक्यातील रुई येथे पोटच्या मुलानेच आपल्या वडिलांची निर्घृण खून केला मिळालेल्या माहितीनुसार, दिलीप धुराजी राजगुरू (वय ४५) यांचा मृतदेह ९ एप्रिल गुरवारी सकाळी त्यांच्या राहत्या घरी रक्ताच्या थारोळ्यात आढळून आला. अज्ञात व्यक्तीने कुऱ्हाडीने तोंड, छाती आणि शरीरावर वार करून ही हत्या केल्याचे प्राथमिक तपासात समोर आले. घटनास्थळी आय पी एस जान्हवी शेखर, उपविभागीय पोलीस अधिकारी सिद्धेश्वर धुमाळ व फॉरेन्सिक पथक तसेच पोलिस ठाण्याच्या सहाय्यक पोलीस निरीक्षक वैशाली पवार, जमादार नारायण माळी, शिंदे, पवार तसेच इतर पोलिस कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी पंचनामा करून मृतदेह पुढील तपासासाठी तीर्थपुरी प्राथमिक आरोग्य केंद्र येथे शवविच्छेदनासाठी पाठवला.

या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला असून तपासादरम्यान पोलिसांनी अवघ्या दोन तासांत आरोपींना अटक केली आहे. या प्रकरणातील मुख्य संशयित आरोपी म्हणजे मयताचा मुलगा विशाल उर्फ विलास राजगुरू (वय १९) असून त्याच्यासोबत एक



अल्पवयीन साथीदारालाही ताब्यात घेण्यात आले आहे. धक्कादायक बाब म्हणजे दोघांनीही गुन्ह्याची कबुली दिली आहे. तपासात उघड झालेल्या माहितीनुसार, दिलीप राजगुरू यांच्या पत्नीचे पूर्वी निधन झाले होते आणि ते दुसऱ्या लग्नाच्या तयारीत होते. मात्र, याच गोष्टीचा राग मनात धरून मुलाने आपल्या वडिलांची हत्या केल्याचे समोर आले आहे.विवाहाच्या दिवशीच घडलेली ही थरारक घटनेमुळे अंबड तालुक्यात एकच खळबळ उडाली या प्रकरणाचा अधिक तपास पोलीस करत आहेत.

## शहरात पाणीपुरवठा विस्कळीत; ४० वर्षे जुन्या जलवाहिनीला गळती

अहिल्यानगर । प्रतिनिधी

अहिल्यानगर शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या ४० वर्षे जुन्या ११०० एमएम व्यासाच्या मुख्य जलवाहिनीला नांदगाव शिवारात मंगळवारी सकाळी मोठी गळती लागल्याने काल उपनगरात पाणीपुरवठा होऊ शकला नाही. महापालिकेने युद्धपातळीवर दुरुस्तीचे काम पूर्ण करत सायंकाळी साडेसहाच्या सुमारास पुन्हा पाणी उपसा सुरू केला. सुमारे दहा ते बारा तास पाणी उपसा बंद राहिल्याने पाणीपुरवठा विस्कळीत झाला आहे. दरम्यान, अमृत योजनेतील नव्या जलवाहिनीमुळे शहराच्या उर्वरित भागात नियमित पाणीपुरवठा करण्यात आला.

नांदगाव शिवारातील देवनदीजवळ जाधव यांच्या शेतामध्ये हवेच्या आणि पाण्याच्या दाबाने जलवाहिनीच्या जॉईंटला गळती लागली. यातून मोठ्या प्रमाणावर पाणी वाया जात असल्याने मुळानगर येथून होणारा पाणी उपसा तातडीने थांबवण्यात आला.

त्यामुळे पाणी वितरण व्यवस्थेच्या टाक्या निर्धारित वेळेत पूर्ण क्षमतेने भरता आल्या नाहीत. परिणामी, बोल्हेगाव, नागापूर, सावेडी उपनगरातील पाईप लाईन रोड, ढवणवस्ती परिसर आणि वैदूवाडी या भागास पाणी पुरवठा होऊ शकला नाही. या भागाला आज (बुधवारी) पाणी दिले जाणार आहे. महापालिकेने मंगळवारी सायंकाळपर्यंत जलवाहिनी दुरुस्तीचे काम पूर्ण केले.

## संशयित ब्लॅकमेल आणि अत्याचार प्रकरणाने पाथर्डीत खळबळ; तक्रार दडपल्याची चर्चा

**प्रा.दादासाहेब खेडकर । पाथर्डी**

पाथर्डी तालुक्यातील ग्रामीण भागात एका महिलेवर कथित ब्लॅकमेल आणि लैंगिक अत्याचाराचा गंभीर प्रकार घडल्याची चर्चा सध्या वेगाने पसरत आहे. या प्रकरणात एका पोलीस कर्मचाऱ्यासह एका शिक्षकाचा सहभाग असल्याचा आरोप स्थानिक पातळीवर केला जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित महिलेला धमकावून व भीतीचे वातावरण निर्माण करून तिच्यावर वारंवार अत्याचार केल्याचा आरोप आहे. या त्रासाला कंटाळून पीडित महिलेने दि. ७ एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी पाथर्डी पोलीस ठाणे गाठून तक्रार देण्याचा प्रयत्न केल्याचे बोलले जात आहे. मात्र, तक्रार अधिकृतपणे दाखल होण्यापूर्वीच काही मध्यस्थांनी हस्तक्षेप करून हे प्रकरण दडपल्याची चर्चा तालुक्यात उघडपणे होत आहे. तक्रार नोंदवली गेल्यास संबंधित पोलीस कर्मचारी आणि शिक्षक यांची प्रतिमा मलिन होण्याची भीती असल्याने 'तडजोडी'चा मार्ग स्वीकारण्यात आल्याचेही सांगितले जात आहे. तसेच, पीडितेला आर्थिक प्रलोभन देण्याचाही प्रयत्न झाल्याची चर्चा आहे. समाजाचे रक्षण करणारा पोलीस आणि विद्यार्थ्यांना दिशा देणारा शिक्षक या दोघांवर असे गंभीर आरोप होत असल्याने नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. या प्रकरणामुळे ''रक्षकच भक्षक झाले तर न्याय कुणाकडे मागायचा?'' असा प्रश्न सर्वसामान्यांकडून उपस्थित केला जात आहे. सध्या हे प्रकरण चर्चेच्या पातळीवर असले तरी यामागील सत्य समोर येण्यासाठी निष्पक्ष आणि सखोल चौकशी होणे आवश्यक असल्याची मागणी जोर धरत आहे. संबंधित घटनेत कोण दोषी आहे, तसेच प्रकरण दडपण्यासाठी कोणाचा हस्तक्षेप झाला का, याची पारदर्शक तपासणी होणे गरजेचे असल्याचे सुज्ञ नागरिकांचे मत आहे.

दि.७ एप्रिल २०२६ रोजी सदरील पीडित महिला पाथर्डी पोलीस ठाण्यात सायंकाळी पाथर्डी पोलीस ठाण्यातील कर्मचारी व एक शिक्षक यांचे विरोधात फिर्याद देण्यासाठी आली होती. त्या दिवशीचे सीसीटीव्ही फुटेज मिळवण्यासाठी माहितीच्या अधिकारात मागणी केली जाणार आहे. तसेच गेल्या सहा महिन्यातील पाथर्डी पोलीस ठाण्यातील तो खाकीला डाग लावणारा पोलीस कर्मचारी व शिक्षक यांचे सीडीआर, बँक डिटेल्स व डीएनए सँपल (रक्ताचे नमुने) ही माहिती संग्रहित केली तर पीडित महिलेवर अत्याचार झाल्याची गंभीर बाब समोर येईल. दोषी पोलीस वर्दीतील दरोगा व दागी शिक्षक यांचे काळे कारणामे समोर येतील या प्रकरणाची सखोल चौकशी होणे गरजेचे आहे.

### पोलीस अधीक्षक यांच्याकडे चौकशीची करणार मागणी

पिडित महिलेचे नाव गाव व तिच्यावर लैंगिक अत्याचार करणाऱ्या पाथर्डी पोलीस ठाण्यातील खाकी वर्दीतील भाऊ आणि एजंट विनोद यांची संपूर्ण कुंडली हाती लागली असली तरी सार्वजनिकरित्या पुराव्याअभावी किंवा पाथर्डी पोलीस ठाण्यात पीडित महिलेने लेखी तक्रार न दिल्याने ती सार्वजनिक करता येत नाही. परंतु या संदर्भात जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे या पीडित महिलेच्या अत्याचाराची चौकशी करण्याची मागणी करण्यात येणार असल्याचे कळत आहे.

जाहीर प्रगटन

**मा. श्री. मा.ये.वाघ ५ वे दिवाणी न्यायाधीश व. स्तर, बीड, ता. जि. बीड यांच्या न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्र. ५६०/२०२६**
**ॲड, तावरे बी.एन. यांचे मार्फत**
**पद्मीनबाई आनवणे वि. निरंक**

ज्यापेक्षा गोकुळ पि. पंढरी आनवणे, हे दिनांक १०/०३/२०२६ रोजी चाकरवाडी, ता. जि. बीड येथे मयत झालेल्या आहे, आणि तसेच अर्जदार १. पद्मीनबाई भ्र. गोकुळ आनवणे, वय. ७६ वर्षे, धंदा. घरकाम, रा. चाकरवाडी, ता.जि.बीड २. मनोहर पि. गोकुळ उर्फ गोकुळराव आनवणे, वय. ५८ वर्षे, धंदा. शेती, रा. चाकरवाडी, ता.जि.बीड ३. सौ. सुरेखा भ्र. युवराज कदम, वय. ४९ वर्षे, धंदा. घरकाम, रा. राजेगाव, ता.केज, जि.बीड अर्जदार क्र. १ ही मयताची पत्नी असुन, अर्जदार क्र. २ हा मयताचा मुलगा असुन, अर्जदार क्र. ३ ही मयताची विवाहीत मुलगी आहे. असे वरील अर्जदारांचे म्हणणे आहे. वरील अर्जदार यांनी ते मयताचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र त्यांच्या हक्कात मिळण्यासाठी या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा सदरहु अर्जदार हे मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत, त्यांनी हया कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट, सदरहु अर्जदारांच्या हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन, त्यांचा/अर्जदारांचा हक्क शाबीत दिसल्यास, त्यांना / अर्जदारांना सदरहु मयत नामे गोकुळ पि. पंढरी आनवणे, यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

प्रकरणाची पुढील तारीख ०७/०५/२०२६ ही आहे. आज दिनांक १० एप्रिल २०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्या निशी दिले.

स्वाक्षरित
**कनिष्ठ लिपिक**
दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड

स्वाक्षरित
आदेशावरुन
**अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड.

## वीजपुरवठ्याच्या कमी दाबाविरोधात ग्रामस्थ आक्रमक

धाराशिव। प्रतिनिधी

गेल्या काही वर्षांपासून मंजूर असूनही रखडलेले गिरवली फाटा येथील ३३ केव्ही उपकेंद्र आणि शेतीपंपांना होत असलेल्या कमी दाबाच्या वीजपुरवठ्याच्या प्रश्नावर राष्ट्रवादी युवक काँग्रेस (अजित पवार गट) व ग्रामस्थांनी आक्रमक पवित्रा घेत धुळे सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर 'रास्ता रोको' आंदोलन केले. या आंदोलनामुळे काही काळ वाहतूक विस्कळीत झाली होती.

ईट येथील वीज वितरण कंपनीच्या ३३ केव्हीए क्षमतेच्या उपकेंद्रावरून १५ ते १७ गावांना घरगुती तसेच शेतीपंपासाठी वीजपुरवठा केला जातो. मात्र हा पुरवठा कमी दाबाने होत असल्याने शेतकरी व नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. याशिवाय गिरवली फाटा येथे मंजूर असलेले ३० केव्हीए उपकेंद्रही अद्याप सुरू झालेले नाही. या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे सुनील देशमुख व पंचायत समिती सदस्य बाळासाहेब खरवडे यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन करण्यात आले. आंदोलनात ग्रामपंचायत सदस्य सयाजी हुबे, सरपंच संजय असलकर, इम्रान पठाण यांच्यासह कार्यकर्ते, शेतकरी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.दरम्यान,



महावितरणच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी १५ दिवसांत मागण्या पूर्ण करण्याचे लेखी आश्वासन दिल्यानंतर आंदोलन तूर्तास स्थगित करण्यात आले. यावेळी गिरवली फाटा येथील ३३ केव्हीए उपकेंद्राचे काम त्वरित सुरू करावे, अतिवृष्टीमुळे खराब झालेल्या वीज वाहिन्यांची आणि खांबांची दुरुस्ती करावी, सिंगल फेजवरील भार कमी करण्यासाठी १०० एचपी आणि २५ एचपीचे नवीन ट्रान्सफॉर्मर बसवावेत, शेती पंपाला पूर्ण दाबाने १२ तास वीजपुरवठा करावा अशा प्रमुख मागण्या यावेळी करण्यात आल्या.

## शिक्षक नसल्याने सिल्लोड पंचायत समितीत भरली विद्यार्थ्यांची शाळा

### चिंचखेडा जि.प. शाळेत सहा महिन्यांपासून एकच शिक्षक

सिल्लोड । प्रतिनिधी

सिल्लोड तालुक्यातील चिंचखेडा जि.प. शाळेत गेल्या सहा महिन्यांपासून एकच शिक्षक आहे. तेही कधी तरी येतात. कधी शाळेचे हुशार विद्यार्थी, तर कधी त्या शिक्षकांच्या कारचा चालक विद्यार्थ्यांना शिकवत असल्याने त्रस्त ग्रामस्थांनी सोमवारी दुपारी १ वाजता सिल्लोड पंचायत समिती कार्यालयात शाळा भरवली. यामुळे शैक्षणिक क्षेत्रात खळबळ उडाली आहे.

तालुक्यातील चिंचखेडा येथील जिल्हा परिषद शाळेतील शिक्षण व्यवस्थेचा बोजवारा उडाल्याचे गंभीर वास्तव समोर आले आहे. शिक्षक वारंवार गैरहजर राहत असल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे. अधिक धक्कादायक म्हणजे, शाळेत कार्यरत असलेल्या बदर या शिक्षकांच्या अनुपस्थितीत त्यांच्या वाहनाचा चालक विद्यार्थ्यांना शिकवत असल्याचा पाढा काही विद्यार्थ्यांनी गटशिक्षणाधिकारी यांच्यासमोर वाचला. शिक्षणाचा दर्जा पूर्णपणे खालावला आहे. या गंभीर प्रकाराबाबत शालेय चिंचखेडा शाळेतील प्रकाराबाबत शालेय समितीची तक्रार आली आहे. मात्र दोन्ही शिक्षकांचा अपघात झाल्याने हा प्रश्न निर्माण झाला आहे. चौकशी करून कार्यवाही करू. – गटशिक्षणाधिकारी रमेश ठाकूर, सिल्लोड ६ एप्रिल रोजी सकाळी साडेअकरा वाजेपर्यंत एकही शिक्षक शाळेत उपस्थित नसल्याने विद्यार्थ्यांनाच शिक्षक बनून वर्ग चालवावा लागला. नियुक्त असलेले शिक्षक कधी येतात, तर कधी नाहीत. यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे, असे शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष गणपत वाणी यांनी सांगितले. व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष गणपत वाणी यांनी गटविकास अधिकारी रत्नाकर पगार, गटशिक्षण अधिकारी रमेश ठाकूर यांच्याकडे लेखी तक्रार केली आहे.

**संत वामनभाऊ अर्बन को-ऑप. क्रेडीट सोसायटी, लि. बीड.**

**अंतिम जाहीर सूचना**

जा.क्र.कलम १०१/सन-२०२६. दिनांक - ०९/०४/२०२६.

संत वामनभाऊ अर्बन को-ऑप. क्रेडीट सोसायटी लि. बीड अंबिका चौक, पांगरी रोड बीड, या संस्थेच्या थकीत सभासद व त्यांचे जामीनदार यांना अंतिमतः या जाहीर सूचनेव्दारे सूचित करण्यात येते की, आपण पूढील उल्लेखित कर्जदार व सहकर्जदार यांना महाराष्ट्र सहकारी संस्था अधि. १९६० चे कलम १०१ (१) अन्वये लेखी सूचना व सुनावणी नोटीस पाठविलेल्या असतांनाही आपण त्यास कसलीही दाद दिली नाही मे. उपनिबंधक, सहकारी संस्था, ता. बीड यांनी दि. ३०/०३/२०२६ व ०९/०४/२०२६ रोजी खालील उल्लेखीत यांना सुनावणीची संधी दिली असतांनाही आपण सूनावणीस गैरहजर राहीलात अथवा आपण लेखी म्हणने सादर केले नाही. अथवा रक्कम भरणा केली नाही त्यामूळे या नैसर्गिक न्याय तत्वाने पून्हा एक अंतिमतः संधी देण्यात येत आहे. कर्जदार व जामीनदार तथा सहकर्जदार यांनी कार्यालयीन वेळेत दि. १६/०४/२०२६ रोजी सकाळी ठिक ११-०० वाजता उपनिबंधक, सहकारी संस्था, ता. बीड या कार्यालयात उपस्थीत राहून आपली बाजू आपण स्वतः अथवा आपले प्रतिनीधी मार्फत मांडावी तथा आपले लेखी स्वरूपात सादर करावे तथा संपूर्ण कर्ज बाकी भरणा करावी, नसता आपणाविरूध्द एकतर्फी आदेश प्रमाणपत्रासह निर्गमीत करून पूढील कार्यवाही करणेत येईल व यासाठी होणा-या परीणामास व, खर्चास आपण स्वतः जबाबदार रहाल याची विशेष नोंद घ्याची.

| दावा क्र. | कर्जदार व जामीनदार | | येणे बाकी दि.३१/१२/२०२५ अखेर |
|---|---|---|---|
| १३४ | श्री. नागरगोजे संदिप शिवनाथ, मु. पो. जांब ता. शिरूर का. जि. बीड. | जाब देणार | |
| १३४A | श्री. खाडे अभिजीत अशोक, मु. पो. जांब ता. शिरूर का. जि. बीड. | जाब देणार | रू. १,४८,७८४/- |
| १३४B | श्री. वायभसे पंडित कैलास, मु. पो. जांब ता. शिरूर का. जि. बीड. | जाब देणार | |

ठिकाण - बीड
दिनांक - ०९/०४/२०२६.

कार्यालयीन मुद्रा

स्वाक्षरित
(सचिन घोडके)
उपनिबंधक
सहकारी संस्था, ता. बीड.

# खरवंडी का.भगवान विद्यालय येथे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व शिबिर संपन्न!

पाथर्डी । प्रतिनिधी

महाराष्ट्र शासन महसूल विभागाच्या वतीने पाथर्डी तालुक्यातील खरवंडी कासार येथे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व शिबिर शुक्रवारी भगवान विद्यालय येथे संपन्न झाले या शिबिराचे उद्घाटन आ.मोनिका राजळे यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी प्रांताधिकारी प्रसाद मते नायब तहसीलदार रवींद्र शेकटकर दिग्विजय पाटील भाजपा तालुकाअध्यक्ष धनंजय बडे काशीबाई गोल्हार यांच्या हस्ते छत्रपती शिवरायांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमास प्रारंभ करण्यात आला.

महाराजस्व शिबिर अभियानाच्या माध्यमातून गोरगरीब जनतेला व लाभार्थी व्यक्तींना शासनाचे विविध योजनेचे मोफत लाभ मिळवून देणे महसूल कृषी आरोग्य महिला बालकल्याण लेक लाडकी योजनेच्या माध्यमातून महिलांना सशक्त करण्याचे शासनाचे ध्येय आहे.

–प्रसाद मते प्रांताधिकारी पाथर्डी

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली महायुतीचे सरकार विकासाच्या विविध योजना राबवत असून सामान्य जनतेला केंद्रबिंदू मानून महसूल भूमिअभिलेख आरोग्य कृषी एकात्मिक बालविकास गोपीनाथ मुंडे अपघाती विमा व लेक लाडकी योजनेच्या माध्यमातून लाभार्थ्यांना प्रमाणपत्र देण्यात आले यामुळे सरकारचे धोरणात्मक निर्णय सर्वसामान्यांपर्यंत पोहोचत असून या विज्ञान व तंत्रज्ञानाच्या युगात सामान्य व्यक्तींना सरकारी कार्यालयात हेलपाटे न मारता जागेवर सरकारी योजनेचा लाभ घेता यावा असे या योजनेचे उद्दिष्ट आहे तसेच ग्रामीण भागातील शेतपानंद रस्त्यासाठी महाराष्ट्र शासन सरकारने २००० हजार कोटींची तरतूद केली असून लवकरच पाथर्डी तालुक्यात गाव खेडे व शिवारात शेतपानंद रस्त्याच्या कामांना प्रारंभ होणार आहे.

–आ.मोनिका राजळे

यावेळी अंकुशराव कासुळे संजय किर्तने वामनराव किर्तने नितीन किर्तने जगन्नाथ खेडकर बाळासाहेब गोल्हार किरण खेडकर भगवान हजारे महेश बोरुडे रामनाथ खेडकर महादेव जायभाये आजिनाथ किर्तने आबासाहेब खेडकर सचिन गायकवाड पंढरीनाथ केकाण दादा जाधव कृषी सहाय्यक ज्ञानेश्वर दौंड आरोग्य अधिकारी स्नेहल लाड आरोग्य निरीक्षक आजिनाथ आव्हाड दादासाहेब धाकतोडे कामगार तलाठी इब्राहिम पटेल विक्रमसिंग ब्रह्मनात रवींद्र नेलवाडे तसेच महसूल कृषी आरोग्य पुरवठा विभागाचे कर्मचारी व परिसरातील कार्यकर्ते उपस्थित होते

छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व शिबिराच्या माध्यमातून आधार सेवा सेतू सेवा भूमिअभिलेख कृषी पीएम किसान अनुदान मोफत आरोग्य तपासणी एकात्मिक बालविकास सेवा रेशन कार्ड कृषी अवजारे इत्यादी लाभार्थ्यांना प्रमाणपत्र व साहित्य वाटप करण्यात आले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन किरण केळगंद्रे यांनी तर आभार बाळासाहेब गोल्हार यांनी माणले. गोपीनाथ मुंडे अपघाती विमा योजना लाभार्थी (सुलभा गाडे)लेक लाडकी योजना लाभार्थी (राधा माताडे)संजय गांधी निराधार योजना लाभार्थी (श्रीधर बोरुडे)महसूल वारस नोंद लाभार्थी(नितीन कराड)(अशोक कांबळे)(अशोक गर्जे)यांना आ.मोनिका राजळे यांच्या हस्ते प्रमाणपत्र देण्यात आले.

# शासनाच्या योजना फक्त कागदावरच

## शिवाजी महाराज राजस्व अभियान कार्यक्रमात माजी आ.दरेकरांनी काढले प्रशासनाचे वाभाडे

आष्टी । प्रतिनिधी

महाराष्ट्र शासनाच्या महत्त्वाकांक्षी ''शिवछत्रपती शिवाजी महाराज राजस्व अभियान'' अंतर्गत टाकळसिंग येथे आयोजित ''शासन आपल्या दारी'' शिबिराला ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. ग्रामीण भागातील नागरिकांना विविध शासकीय योजनांचा लाभ थेट त्यांच्या दारी मिळावा, तसेच योजनांच्या अंमलबजावणीत येणारे अडथळे दूर व्हावेत या उद्देशाने हे अभियान राबविण्यात येत आहे. यावेळी माजी आमदार साहेबराव दरेकर यांनी शासनाच्या कारभारावर सडकून टीका केली. शासनाच्या योजना कागदावरच चांगल्या दिसतात. त्या सर्वसामान्य माणसापर्यंत पोहोचतच नाहीत अशी टीका माजी आमदार साहेबराव दरेकर यांनी या अभियानाच्या शुभारंभ प्रसंगी केली.

टाकळसिंग मंडळाच्या वतीने आयोजित या शिबिराचे उद्धाटन दीपप्रज्वलनाने करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुद्रांक शुल्क अधिकारी आटोळे होते, तर प्रमुख अतिथी म्हणून माजी आमदार साहेबराव दरेकर (नाना), तहसीलदार वैशाली पाटील, माजी सभापती बद्रीनाथ जगताप, सरपंच वाघमोडे, बबन झांबरे, नायब तहसीलदार माडेकर आदी मान्यवर उपस्थित होते.

प्रास्ताविक करताना नायब तहसीलदार माडेकर यांनी स्पष्ट केले की,हे अभियान केवळ औपचारिक कार्यक्रम नसून नागरिकांच्या अडचणींचे थेट निराकरण करणारा उपक्रम आहे. महसूल, पंचायत समिती, कृषी, सामाजिक न्याय, मुद्रांक विभाग यांसह सर्व विभागांचे अधिकारी एकाच ठिकाणी उपलब्ध करून देत नागरिकांना सुलभ सेवा देण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.





या शिबिरात संजय गांधी निराधार योजना,श्रावणबाळ योजना, घरकुल,शेततळे, विहीर, शेतरस्ते व जमिनीचे वाद यांसारख्या विविध प्रश्नांवर थेट मार्गदर्शन व अर्ज स्वीकृती करण्यात आली.यावेळी माजी आमदार साहेबराव दरेकर यांनी आपल्या भाषणात प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर थेट बोट ठेवत कडक शब्दांत टीका केली ''शासनाच्या योजना कागदावर चांगल्या दिसतात, पण प्रत्यक्षात त्या सामान्य माणसापर्यंत पोहोचत नाहीत,'' अशी खंत त्यांनी व्यक्त केली.तसेच त्यांनी काही गंभीर मुद्दे उपस्थित केले.तलाठी कार्यालयात नियमित हजर राहत नसल्याने शेतकऱ्यांची कामे रखडतात

आठवड्यातून किमान दोन दिवस तलाठी सजावर बसणे बंधनकारक करावे. अन्यथा महसूल मंत्र्यांकडे तक्रार करण्याचा इशारा

पीक पाहणी प्रक्रियेबाबत बोलताना त्यांनी सांगितले की''अशिक्षित शेतकऱ्यांना मोबाईलवर पीक पाहणी करणे अवघड जाते. ग्रामसेवक, तलाठी आणि कृषी सेवकांनी पुढाकार घेऊन पान ३ वर

# आष्टीत डायलिसिस सेंटर शुभारंभाच्या प्रतीक्षेत

आष्टी । प्रतिनिधी

आमदार सुरेश धस यांच्या पाठपुराव्यामुळे आष्टीच्या ग्रामीण रुग्णालय परिसरामध्ये अद्ययावत डायलिसिस सेंटर ची निर्मिती करण्यात आली असून शुभारंभाच्या प्रतीक्षेत आहे या ठिकाणी लवकरच रुग्णांवर डायलिसिस उपचार सुरू होणार आहेत या डायलिसिस सेंटर मुळे बीड ते नगर तसेच लगतच्या जामखेड पाथर्डी कर्जत पाटोदा येथील रुग्णांची मोठी सोय होणार आहे ही सेवा विनामूल्य असणार असल्यामुळे गोरगरीब रुग्णांना मोठा दिलासा मिळणार आहे एच एल एल लाईफ केअर लिमिटेड या कंपनीशी शासनाने याबाबत करार केला असून ग्रामीण रुग्णालय परिसरात हे डायलिसिस सेंटर उभारले गेले असून रविवार वगळता सोमवार ते शनिवार सकाळी ९.००ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत या ठिकाणी डायलिसिस रुग्णांवर उपचार करण्यात येतील



या उपचारासाठी कोणतेही शुल्क आकारण्यात येणार नसून सर्व उपचार विनामूल्य असणार आहेत यामुळे गोरगरीब रुग्णांना मोठा दिलासा मिळणार आहे

–सुरेश धस, आमदार, आष्टी

रुग्ण ग्रामीण रुग्णालयात येईल तिथे तपासणी होईल ॲडमिट चे कार्ड देण्यात येईल त्यानंतर डायलिसिस सेंटर मध्ये त्याच्यावर उपचार करण्यात येतील

–डॉ.रामदास मोराळे वैद्यकीय अधीक्षक,

ग्रामीण रुग्णालय आष्टी

या डायलिसिस सेंटर मध्ये हाउसकीपिंग, स्टाफ नर्स आणि टेक्निशियन असे ०४ कर्मचारी सतत हजर राहतील डायलिसिस साठी लागणारी औषधे कंपनीतर्फे देण्यात येतील दररोज जास्तीत जास्त १५ रुग्णांवर उपचार करण्याची रुग्णालयाची क्षमता आहे

–विकास कदम क्लस्टर हेड, मुंबई

# साडे नऊ लाखांच्या मुद्देमालासह अल्युमिनीयम तार चोरणारा टेंम्पो पकडला

**बीड स्थानिक गुन्हे शाखेची मोठी कारवाई**

बीड । प्रतिनिधी

जिल्ह्यामध्ये चोरीच्या घटनांना आळा घालण्यासाठी स्थानिक गुन्हे शाखा सतर्क झाली असून, नेकणूर मार्गे केजकडे जाणारा चोरीच्या अल्युमिनीयम तारांनी भरलेला आयशर टॅम्पो पोलिसांनी पकडला आहे. या कारवाईत एकूण ९,५०,००० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून एका आरोपीला ताब्यात घेण्यात आले आहे.

स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला गुप्त



बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, ९ एप्रिल २०२६ रोजी एका विटकरी रंगाच्या आयशर टॅम्पोमधून विद्युत वितरण कंपनीच्या मालकीची चोरीची तार विक्रीसाठी नेली जात आहे. ही माहिती मिळताच पथकाने नांदूर फाट्याजवळ सापळा रचून संशयास्पद टॅम्पो थांबवला.

टॅम्पोची झडती घेतली असता, त्यामध्ये अल्युमिनीयम तारांचे १२ बंडल आढळून आले. याचे एकूण वजन अंदाजे १५०० किलो असून त्याची बाजारभावानुसार किंमत ४,५०,००० रुपये इतकी आहे. पोलिसांनी तारांसह वाहतुकीसाठी वापरलेला आयशर टॅम्पो देखील जप्त पान ३ वर



माजलगाव:– श्री स्वामी समर्थ सेवा केंद्र दिंडोरी प्रणित शाहूनगर माजलगाव येथे श्रीस्वामी पुण्यतिथी अखंड नाम जप यज्ञ सप्ताह निमित्त गुरुचरित्र पारायणासाठी बसलेले भाविक सेवेकरी

# बाबा आमटे साहित्यनगरीत रंगले कथाकथनाचे सत्र; रसिकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद

शिरूर कासार । प्रतिनिधी

भवानी विद्यार्थी कल्याण प्रतिष्ठान, शांतिवन यांच्या वतीने आयोजित ४५ वे मराठवाडा साहित्य संमेलन आर्वी येथे उत्साहात सुरू असून १० एप्रिल रोजी संमेलनाचा शुभारंभ झाला. संमेलनाच्या विविध साहित्यिक कार्यक्रमांमध्ये दुपारच्या सत्रात कवी विठ्ठल बिडकर व्यासपीठावर कथाकथनाचा बहारदार कार्यक्रम पार पडला.या सत्राच्या अध्यक्षस्थानी प्रख्यात साहित्यिक डॉ. भास्करराव बडे उपस्थित होते. कार्यक्रमात विविध कथाकारांनी आपल्या वैशिष्ट्यपूर्ण शैलीत कथा सादर करून श्रोत्यांची मने जिंकली.

नांदेड येथील कथाकार बालाजी इवितदार यांनी ग्रामीण वास्तवावर भाष्य करणारी 'बिझनेस' ही कथा प्रभावीपणे सादर केली. त्यांच्या कथेतून ग्रामीण भागातील बदलते सामाजिक व आर्थिक चित्र जिवंतपणे उभे राहिले.यानंतर देवणी येथील हास्यकवी शिवाजी बिरादार यांनी पान ३ वर

# माजलगावमध्ये पत्रकारास मारहाण व धमकीप्रकरणी तिघांविरूद्ध गुन्हा दाखल

माजलगाव । प्रतिनिधी

शहरातील माजलगाव येथे पत्रकारास मारहाण करून रोख रक्कम लुटल्याप्रकरणी तिघांविरुद्ध पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना दि. ७ एप्रिल २०२६ रोजी दुपारी सुमारे ४ वाजण्याच्या सुमारास घडली.

याबाबत फिर्यादी भगीरथ गौरीशंकर तोडकरी (वय ३७, व्यवसाय – पत्रकारिता) यांनी माजलगाव शहर पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे. फिर्यादी हे आपल्या पत्नी व मुलांसह राहत असून, घटनेच्या दिवशी ते संकल्प हॉस्पिटलसमोर गाडी थांबवून मित्राशी बोलत असताना ही घटना घडली.

तक्रारीनुसार, आरोपी नारायण शेजुळ, राहुल शेजुळ व नितीन गायकवाड यांनी जुन्या भांडणाच्या कारणावरून फिर्यादीस शिवीगाळ करत मारहाण पान ३ वर



# पाटोदा तालुक्यातील समविचारी पक्षांचे धरने आंदोलन यशस्वी

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील समविचारी पक्षांचे धरने आंदोलन हा मागील काही दिवसांपासुन बहुचर्चित विषय राहिला आहे, दि. २३ मार्च २०२६ रोजी पाटोदा येथील शासकीय विश्रामगृह येथे सर्व समविचारी पक्षांची बैठक घेण्यात आली होती, व त्यामध्ये सर्व पक्षांचे विचार विनिमय होऊन शेतकरी व जनसामान्यांच्या एकुन १९ मागण्या घेऊन दि. ०९ एप्रिल २०२६ रोजी पाटोदा उप विभागीय अधिकारी साहेब यांच्या कार्यालयासमोर धरने आंदोलन करण्याचे सर्वानुमते ठरल्यामुळे तसे निवेदन दि. २५ मार्च २०२६ रोजी पाटोदा उप विभागीय अधिकारी साहेब यांना देण्यात आले होते.



सदर समविचारी पक्षांच्या धरने आंदोलनात महाराष्ट्र राज्यातील शेतकऱ्यांची कुठल्याही अटी व शर्ती न लादता सरसकट कर्जमाफी करण्यात यावी व सर्व शेतकऱ्यांचे सातबारा चे उतारे कोरे करण्यात यावेत या प्रमुख मागणीसह सन २०२०,२०२५ रोजीचा पुर्ण खरीप पीक विमा तसेच सन २०२३ - २०२४ चा राहिलेला ७५ टक्के पिक विमा देण्यात यावा, १९ मार्च २०२६ रोजी पाटोदा तालुक्यात गारपीटीने झालेल्या पीकाचे नुकसानीचे पंचनामे करून नुकसान ग्रस्त शेतकऱ्यांना तात्काळ नुकसान भरपाई देण्यात यावी, देशातील सर्व शाळेमध्ये भारतीय संविधान शिकवण्यात यावे, सर्व घरकुल योजनेतील लाभार्थींना मोफत वाळु उपलब्ध करून द्यावी, तसेच घरकुलाचे हप्ते तात्काळ देण्यात यावेत, व हप्ते काढण्यासाठी लाच घेणार्या कर्मचार्यांवर कारवाई करण्यात यावी इ. मागण्यांसह एकुन १९ मागण्या घेण्यात आल्या होत्या. या पाटोदा तालुक्यातील समविचारी पक्षांचे आंदोलनात भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (श.प.), शिवसेना (उ.बा.ठा.), वंचित बहुजन आघाडी, भारतीय कम्युनिस्ट पक्ष, भारतीय शेतकरी कामगार पक्ष, बहुजन समाज पार्टी, जनशक्ती पान ३ वर

# आज काँग्रेसच्या वतीने संघटन सृजन अभियान ; नीतू वर्मा करणार पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन–बेदरे

गेवराई । प्रतिनिधी

अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या वतीने संपूर्ण देशभरामध्ये विविध राज्यांमध्ये संघटन सृजन अभियान राबविण्यात येत आहे. याच अनुषंगाने बीड जिल्हा काँग्रेस कमिटीच्या गेवराई येथे काँग्रेस पक्षाने संघटनात्मक बळकटीसाठी सुरू केलेले 'संगठन सृजन अभियान' आज दी. ११/४/२०२६ शनिवार रोजी होणार आहे. तसेच गेवराई तालुक्यातील अखिल भारतीय काँग्रेस कमिटीची आढावा बैठक व पदाधिकारी निवड संदर्भात बैठक होणार आहे. तरी गेवराई तालुक्यातील काँग्रेस सर्व पदाधिकारी यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन काँग्रेस कमिटीचे तालुकाध्यक्ष महेश बेदरे यांनी केले आहे.



याबाबत अधिक माहिती अशी की, अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या वतीने संपूर्ण देशभरामध्ये विविध राज्यांमध्ये संघटन सृजन अभियान राबविण्यात येत आहे. यामध्ये प्रामुख्याने काँग्रेस पक्षाची पक्ष बांधणी, संघटना मजबुतीकरण हा उद्देश लक्षात घेता या माध्यमातून तालुकाध्यक्ष, शहराध्यक्ष व इतर निवडीचे मुख्य काम या अभियानाच्या माध्यमातून केले जाणार आहे.

काँग्रेसच्या नेत्या सोनिया गांधी, काँग्रेस उपाध्यक्ष तथा लोकसभेचे विरोधी पक्ष नेते खा. राहुल गांधी, मा. मल्लिकार्जून खर्गे, काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ आणि राज्याचे काँग्रेसच्या नेत्या खा. रजनीताई अशोकराव पाटील , मा. अशोकराव पाटील , यांच्या मार्गदर्शनाखाली व अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या संघटन सुजन अभियानच्या बीड जिल्हा प्रमुख मा.श्रीमती नितू वर्मा जी निरीक्षक अ.भा. काँग्रेस कमिटी नवी दिल्ली यांच्या सह मा.एम.एम.शेख (माजी आमदार) मा. सुरेंद्र गोडजकर (संघटन निरीक्षक) मा. श्रीमती विद्याताई पाटील (प्रदेश समन्वयक) तसेच महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे कमिटी सरचिटणीस व मा. नगराध्यक्ष तथा काँग्रेस पक्षाच्या पिंपरी चिंचवड विधानसभा प्रभारी मा. आदित्य दादा पाटील, काँग्रेस पान ३ वर

# गळके बस स्थानक कंत्राटदारावर गुन्हा दाखल करण्यास टाळाटाळ ! डॉ.ढवळे

बीड । प्रतिनिधी

अवकाळी पावसात गळती लागलेल्या बीड मध्यवर्ती बसस्थानक प्रकरणी अखेर संबंधित कंत्राटदार काझी संघाणी ग्रुपला नोटीस बजावण्यात आली आहे. तब्बल १३ कोटी रुपये खर्चून उभारण्यात येत असलेल्या या बसस्थानकात उद्घाटनापूर्वीच पाणी गळती झाल्याचे व्हिडिओ व फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर बीडकरांमध्ये संतापाची लाट उसळली होती.

या प्रकरणावर विविध प्रसारमाध्यमांनी सातत्याने आवाज उठवल्यानंतर प्रशासनाला हालचाल करावी लागली. सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे (लिंबागणेशकर) यांनी मुख्यमंत्री, पालकमंत्री तसेच परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांच्याकडे तक्रार दाखल करून आंदोलनाचा इशारा दिला होता.

**गुन्हा दाखल करण्यात टाळाटाळ का?**

**दरम्यान, ६४ लाख रुपयांच्या हायटेक सिग्नल कोसळण्याच्या प्रकरणात तात्काळ गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्याचवेळी १३ कोटींच्या बसस्थानकातील निकृष्ट कामाबाबत अद्याप गुन्हा दाखल न झाल्याने प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. कोणाच्या राजकीय वरदहस्तांमुळे कंत्राटदारावर गुन्हा दाखल करण्यास टाळाटाळ केली जात आहे? बाहेरील कंत्राटदारांवर कारवाई आणि स्थानिक सगेसोयऱ्यांना मोकळीक का? असा थेट सवाल डॉ. गणेश ढवळे यांनी उपस्थित केला आहे.**

दरम्यान, राज्य परिवहन विभागाकडून सुरुवातीला कंत्राटदाराची पाठराखण करण्यात आली होती. छतावर साचलेला कचरा व धुळीमुळे पाइप चोकअप होऊन पाणी एसीपी पॅनलमध्ये साचल्याने गळती झाल्याचा लेखी खुलासा विभाग नियंत्रकांनी केला होता. तसेच काम प्रचलित तांत्रिक मानकांनुसार पूर्णत्वाच्या अंतिम टप्प्यात असल्याचेही स्पष्ट करण्यात आले होते.

मात्र, वाढत्या जनक्षोभ आणि माध्यमांच्या दबावामुळे अखेर एसटी महामंडळाच्या अधिकाऱ्यांनी कंत्राटदाराला नोटीस बजावत गळतीची जबाबदारी निश्चित केली आहे. मध्यंतरी झालेली पाणी गळती ही कंत्राटदाराची चूक असून, आपल्याविरुद्ध दंडात्मक कारवाई का करण्यात येऊ नये? असा सवाल नोटीसमध्ये उपस्थित करण्यात आला आहे. तसेच काम पूर्ण करून इमारत महामंडळाकडे हस्तांतरित करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.



# नर्मदा तिरावरील महायोगी दादा गुरु महाराज यांची आ.सुरेश धस यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट

आष्टी । प्रतिनिधी

मध्यप्रदेशातील नर्मदा तीरावर दीर्घकाळापासून कठोर साधना करणारे संत समर्थ दादा गुरु महाराज यांनी शुक्रवारी आ.सुरेश धस यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट दिली. या प्रसंगी धस कुटुंबीयांनी त्यांचे सस्नेह व आदरपूर्वक स्वागत केले.

दादा गुरु महाराज हे गेल्या पाच वर्षांहून अधिक काळ 'निराहार' राहून केवळ नर्मदा जल अथवा वायूवर साधना करत असल्याचे मानले जाते. ते नर्मदा नदीचे संरक्षण, पदयात्रा, वृक्षारोपण तसेच पर्यावरण जनजागृती या उपक्रमांमध्ये सक्रिय असून, त्यांनी आतापर्यंत चार लाख



किलोमीटरहून अधिक पायी प्रवास केल्याची नोंद आहे. भेटीदरम्यान दादा गुरु महाराजांनी आ.सुरेश धस व त्यांच्या कुटुंबीयांना आशीर्वाद दिले. तसेच समाजहित, पर्यावरण संवर्धन आणि धार्मिक मूल्यांच्या जपणुकीसाठी सातत्याने कार्यरत राहण्याचे मार्गदर्शन केले. या सदिच्छा भेटीमुळे परिसरात आध्यात्मिक वातावरण निर्माण झाले असून स्थानिक नागरिकांमध्ये उत्सुकता व समाधानाचे वातावरण निर्माण झाल्याचे दिसून आले.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड–४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक–सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक – सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल – rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# पुण्यात पोलिसांकडूनच खंडणीखोरी! प्राचार्यांना 'पोक्सो'ची भीती दाखवून ७ लाख उकळले

पुणे । प्रतिनिधी

पुणे शहरात पोलिसांकडूनच नागरिकांना खोट्या गुन्ह्यांत अडकविण्याची धमकी देत खंडणी उकळण्याचे प्रकार समोर येत असल्याने खळबळ उडाली आहे. वाघोलीतील अभियंता तरुण-तरुणी प्रकरणानंतर आता धनकवडीतील एका प्राचार्यांकडून तब्बल ७ लाख रुपये उकळल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे.



धनकवडी परिसरातील ५५ वर्षीय प्राचार्यांना पोक्सो कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करून अटक करण्याची भीती दाखवत पोलीस उपनिरीक्षक अजित बडे (३८ पर्वती), दामिनी पथकातील एक महिला कर्मचारी (३५, वाघोली) आणि पोलीस अंमलदार सुदाम तायडे (३५, हिंजवडी) यांनी ७ लाख रुपयांची खंडणी उकळल्याचे समोर आले आहे. याप्रकरणी तिघांविरुद्ध बंडगार्डन पोलिसांत गुन्हा दाखल झाला आहे.

यातील महिला कर्मचारी पोलीस दलात कबड्डीपटू आणि रील्सस्टार म्हणून ओळखली जाते. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, जुलै २०२५ मध्ये या तिघांनी संबंधित महाविद्यालयात जाऊन प्राचार्यांना एका विद्यार्थिनीने केलेल्या तक्रारीचा कागद दाखवला. त्यावर कोणतीही अधिकृत नोंद क्रमांक किंवा पोलीस ठाण्याचा शिक्का नव्हता, तरीही मेट्रो स्टेशनवर बंदुकीचा धाक दाखवून विद्यार्थिनीच्या अपहरणाचा प्रयत्न केल्याचा गंभीर आरोप केला.

प्राचार्यांनी आरोप नाकारल्यानंतर, मुलगी अल्पवयीन आहे, पोक्सोअंतर्गत गुन्हा दाखल होऊन अटक होईल आणि संस्थेची बदनामी होईल, अशी धमकी देत माध्यमांमध्ये बातमी झळकवण्याची भीती दाखवली. काही वेळाने १० लाखांत तडजोड झाली, असे सांगत पैसे मागितले. प्राचार्य बडे यांच्या सांगण्याप्रमाणे ७ लाख रुपये मुलीच्या शिक्षणासाठी देण्यास तयार झाले.

अमितेश कुमार, पोलीस आयुक्त पुणे

त्यांनी घरातील आणि कुटुंबातील सदस्यांच्या वेगवेगळ्या बँकेतील खात्यांतून काही रक्कम काढून ७ लाख रकमेची पूर्तता केली. दरम्यान, प्राचार्याविरुद्ध खोटा तक्रार अर्ज दाखल करून ८ मार्च रोजी दरोडा व वाहन चोरीविरोधी पथकाच्या पोलीस निरीक्षकांनी प्राचार्यांना बोलावून घेतले होते.

प्राचार्यांनी चौकशीत सांगितले, की मला ब्लॅकमेल करण्यात आले आहे. मुलीला हाताशी धरून माझ्याकडून पैसे उकळले आहेत. हा प्रकार पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांच्या कानावर जाताच त्यांनी याबाबत कठोर कारवाईचे आदेश दिले. त्याप्रमाणे गुन्हा दाखल करून तपास पोलीस निरीक्षक अश्विनी जगताप यांच्याकडे दिला आहे. ज्या मुलीला समोर करून या तिघांनी प्राचार्यांकडून खंडणी उकळण्याचा डाव रचला, त्या मुलीनेच पलटी मारली. बडे आणि हिंगे या दोघांनी त्या मुलीला दुसऱ्या कॉलेजध्ये प्रवेश मिळवून देण्याचे प्रलोभन दाखविले. मात्र, उद्देश साध्य झाल्यानंतर त्यांनी तिच्याकडे दुर्लक्ष करत तिला ब्लॉक केले.ज्या कॉलेजमध्ये होता, तोही प्रवेश गेला, त्यामुळे त्या मुलीने आणि तिच्या पालकांनी आयुक्त अमितेश कुमार यांची भेट घेऊन तक्रार अर्ज दिला होता. त्याचा तपास गुन्हे शाखेच्या पोलिस निरीक्षक वर्षा देशमुख यांच्याकडे होता. पोलिसांनी या प्रकरणाशी संबंधित असलेले तक्रारदार तपासले, त्या वेळी या तिघांचे हे कारनामे समोर आले.

# पुणे पोलिसांची मोठी कारवाई!

## सिंहगड रोड परिसरात गोळीबार करणाऱ्या ५ अल्पवयीन मुलांच्या आवळल्या मुसक्या

पुणे । प्रतिनिधी

**सिंहगड रोड परिसरात गोळीबार करून दहशत निर्माण करणाऱ्या ५ 'विधिसंघर्षित' (अल्पवयीन) बालकांना पुणे पोलिसांनी अवघ्या २४ तासांच्या आत ताब्यात घेतले आहे. त्यांच्याकडून *एक पिस्तुल आणि दोन लोखंडी कोयते जप्त करण्यात आले असून, या कारवाईमुळे गुन्हेगारी जगतात खळबळ उडाली आहे.**

७ एप्रिल २०२६ रोजी रात्री ११:४५ च्या सुमारास वडगाव बुद्रुक येथील चरवडवस्ती परिसरात ही घटना घडली होती. जुन्या भांडणाचा राग मनात धरून ५ ते ६ आरोपींनी एका व्यक्तीवर लोखंडी हत्याराने वार केले आणि पिस्तुलमधून गोळीबार केला होता. या धक्कादायक प्रकारानंतर परिसरात भीतीचे वातावरण पसरले होते. याप्रकरणी सिंहगड रोड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्ह्याचे गांभीर्य ओळखून परिमंडळ ३ चे पोलीस उपायुक्त संभाजी कदम आणि सहाय्यक पोलीस आयुक्त अजय परमार यांच्या मार्गदर्शनाखाली तपास पथके रवाना करण्यात आली होती. ८ एप्रिल रोजी तपास पथकातील पोलीस अंमलदार विनायक मोहिते आणि तानाजी सागर यांना त्यांच्या खास बातमीदाराकडून माहिती मिळाली की, सदर गुन्ह्यातील आरोपी शरद हॉस्पिटलकडून प्रयोग सिटीकडे जाणाऱ्या रोडवर कोणाची तरी वाट पाहत थांबले आहेत. मिळालेल्या माहितीची खातरजमा करून वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांच्या आदेशाने सहाय्यक पोलीस निरीक्षक समीर करपे, उपनिरीक्षक संतोष भांडवलकर आणि पथकाने सापळा रचला. पोलिसांना पाहताच आरोपींनी पळून जाण्याचा प्रयत्न केला, मात्र पोलिसांनी पाठलाग करून ५ जणांना ताब्यात घेतले. झडती घेतली असता त्यांच्याकडे एक पिस्तुल आणि दोन धारदार कोयते मिळून आले. तपासादरम्यान हे पाचही जण अल्पवयीन असल्याचे निष्पन्न झाले. कायदेशीर प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर त्यांची रवानगी पंडित जवाहरलाल नेहरू बालसुधारगृह, येरवडा येथे करण्यात आली आहे. ही यशस्वी कामगिरी पोलीस आयुक्त अमितेश कुमार, सह पोलीस आयुक्त रंजनकुमार शर्मा, अपर पोलीस आयुक्त राजेश बनसोडे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक विनय पाटणकर, समीर गायकवाड, समीर करपे, संतोष भांडवलकर आणि त्यांच्या टीमने केली आहे. या धडक कारवाईमुळे सिंहगड रोड परिसरातील नागरिकांनी सुटकेचा निश्वास टाकला आहे.

# बालेवाडीत स्व. अजितदादा पवार यांचे स्मारक उभारा; पूनम विधाते यांचे महापालिकेला निवेदन

पुणे । प्रतिनिधी

बालेवाडी परिसरातील आरक्षित जागेवर स्व. अजितदादा पवार यांच्या स्मरणार्थ भव्य स्मारक उभारण्यात यावे, अशी मागणी सामाजिक कार्यकर्त्या पूनम विधाते यांनी केली आहे. याबाबत त्यांनी पुणे महानगरपालिकेच्या महापौर मंजुषा नागपूरे तसेच विरोधी पक्षनेते ॲड. निलेश निकम यांना लेखी निवेदन दिले आहे.



निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, बालेवाडी येथील जकात नाक्यासाठी पूर्वी आरक्षित असलेली जागा नंतर मेट्रो स्टेशनसाठी राखीव करण्यात आली. मात्र, त्या ठिकाणचा काही भाग अद्याप मोकळा असून सार्वजनिक उपयोगासाठी तो उपलब्ध आहे. या जागेचा उपयोग करून स्व. अजितदादा पवार यांचे स्मारक उभारण्याची संधी असल्याचे विधाते यांनी स्पष्ट केले आहे.पुणे शहर आणि महाराष्ट्राच्या विकासात अजित पवार यांचे महत्त्वपूर्ण योगदान राहिले आहे. त्यांच्या कार्यकाळात पायाभूत सुविधा, जलसंधारण, सिंचन आणि विविध विकास प्रकल्पांना गती मिळाली. त्यांच्या कार्याची नोंद कायमस्वरूपी राहावी आणि भावी पिढ्यांना प्रेरणा मिळावी, या उद्देशाने स्मारक उभारण्याची गरज व्यक्त करण्यात आली आहे.

बालेवाडी परिसर हा पुणे महानगरपालिकेच्या हद्दीतील पश्चिम प्रवेशद्वार म्हणून ओळखला जातो. तसेच राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४ (छक-४) लगत असल्यामुळे या ठिकाणी उभारण्यात येणारे स्मारक शहराचे आकर्षण ठरू शकते, असेही निवेदनात नमूद आहे.उर्वरित जागेवर स्व. अजितदादा पवार यांचे भव्य व सुयोग्य स्मारक उभारण्यात यावे, ज्यायोगे त्यांच्या कार्याला अभिवादन करता येईल आणि पुणे शहराच्या वैभवात भर पडेल, अशी मागणी करण्यात आली आहे.

# आंबेगाव तालुक्यातील थोरांदळे शाळेत डॉ. पूनम मलाकोंडय्या यांची भेट; विद्यार्थ्यांशी संवाद

निरगुडसर: थोरांदळे (ता.आंबेगाव)येथील जिल्हा परिषद शाळेत गुरुवार (ता.०९) रोजी विशेष निरीक्षक राष्ट्रीय मानवाधिकार आयोग डॉ.पूनम मलाकोंडय्या यांनी किचन शेड,परसबाग याची पाहणी केली तसेच विद्यार्थ्यांची संवाद साधून विद्यार्थ्यांची गुणवत्ता याची तपासणी केली.



शिक्षकांशी संवाद साधून,शिक्षकांचे शाळेविषयी मत,शिक्षणातील आव्हाने व शिक्षकांकडून शासनाच्या अपेक्षा याबाबत सविस्तर चर्चा केली. यावेळी उपशिक्षणाधिकारी अस्मा मोमीन, गटशिक्षणाधिकारी रुपाली धोका,बालविकास प्रकल्प अधिकारी कुलदीप जाधव,केंद्रप्रमुख सीमा कहडणे यांच्यासह अधिकारी, शिक्षक उपस्थित होते.

शालेय परिसरातील स्वच्छता,शाळा व्यवस्थापन समिती व ग्रामस्थांचे शाळेस असणारे योगदान,शालेय परसबाग तसेच शाळेत राबविले जाणारे विविध उपक्रम यांचे कौतुक केले. यावेळी शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष, उपाध्यक्ष,सदस्य शाळेचे मुख्याध्यापक हेमराज भदाणे, शाळेतील शिक्षक विनायक पडवळ, बाळासाहेब कानडे, संदीप शिंदे,शैला थोरात, विजय डोके, मिलिंद चिखले,श्वेता चिखले व कमल थोरात आदी उपस्थित होते.

# आंबेगावातील शेतकरी दामोदर मिंडे खून प्रकरण उघडकीस

मंचर । प्रतिनिधी

मंचर जवळ थोरांदळे (ता.आंबेगाव) येथे शेतकरी दामोदर जयराम मिंडे (वय ६२) यांच्या घरात चोरट्यांनी प्रवेश करून त्यांच्या डोक्यात लोखंडी पहार टाकून त्यांचा मंगळवारी (ता.३१मार्च ) खून करण्यात आला. सोन्याची अंगठी, रोख रक्कम व मोबाईल असा २९ हजार रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला होता. यामुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. स्थानिक गुन्हा अन्वेषण शाखा व मंचर पोलिसांनी समांतर तपास करून जुन्नर व पारनेर तालुक्यातील १०० सी.सी.टी.व्ही. कॅमेरे तपासून माबोईल लोकेशनच्या आधारे कबीर उंबऱ्या काळे (वय २४, सध्या रा.पुणेवाडी, ता.पारनेर, मुळ रा.सुरेगाव, ता.श्रीगोंदा) व एक विधीसंघर्षित बालक यांना ताब्यात घेतले आहे. त्यांनी गुन्ह्याची कबुली दिली असून गुन्हयात वापरलेली पॅशन मोटारसायकल जप्त केली आहे. अशी माहिती पुणे ग्रामीण पोलीस अधीक्षक संदीप सिंह गिल्ल यांनी दिली.

पुणे येथे पुणे ग्रामीण पोलीस मुख्यालयात गुरुवारी (ता.९) झालेल्या पत्रकार परिषद गिल्ल बोलत होते. यावेळी अप्पर पोलीस अधीक्षक रमेश चोपडे, स्थानिक गुन्हा अन्वेषण शाखेचे पोलीस निरीक्षक प्रमोद क्षीरसागर, मंचर पोलीस ठाण्याचे प्रभारी वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्रीकांत कंकाळ व सहाय्यक पोलीस निरीक्षक महादेव शेलार उपस्थित होते.

आरोपी काळे हा सराईत गुन्हेगार असून त्याच्यावर यापूर्वी बेलवडी, पारनेर, अहिल्यानगर तालुका पोलीस ठाणे, आळेफाटा येथे दरोडा, जबरी चोरी, घरफोडीचे नऊ गंभीर गुन्हे दाखल आहेत. आरोपीला शनिवार (ता.११) पर्यंत पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले आहेत. दरम्यान आरोपीकडे चौकशी केली असता ओतूर, घोडेगाव, मंचर, दिंडोरी येथे गंभीर स्वरूपाचे गुन्हे केल्याचे उघडकीस आले आहे. याकामी मंचर पोलीस ठाणे व स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागाच्या पोलिसांनी केलेल्या तपासाचे कौतुक गिल्ल व चोपडे यांनी केले.

## पुण्यातील आरएमसी व डांबर प्लांट शहराबाहेर; प्रदूषण रोखण्यासाठी मोठा निर्णय

पुणे: शहरातील वाढत्या वायुप्रदूषणावर नियंत्रण मिळवण्यासाठी खासगी तसेच महापालिकेचे रेडीमिक्स काँक्रीट आणि डांबर (हॉटमिक्स) प्लांट शहराबाहेर हलवणे गरजेचे आहे. महापालिकेच्या प्लांटसह सर्व संबंधित प्रकल्प शहराच्या हद्दीबाहेर स्थलांतरित करण्यासाठी प्रशासनाने तातडीने कारवाई करावी, असे आदेश स्थायी समितीत देण्यात आल्याची माहिती अध्यक्ष श्रीनाथ भिमाले यांनी दिली.नगरसेवक हरिदास चरवड यांनी वडगाव परिसरात सुरू असलेल्या आरएमसी प्लांटमुळे मोठ्या प्रमाणावर प्रदूषण होत असल्याची बाब स्थायी समितीसमोर मांडली होती. दाट लोकवस्तीच्या भागात सुरू असलेले असे प्लांट तातडीने हलवावेत, असा प्रस्ताव त्यांनी सादर केला होता. यावर गुरुवारी झालेल्या स्थायी समितीच्या बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली.

या चर्चेनंतर प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या नियमांचे उल्लंघन करून सुरू असलेल्या आरएमसी तसेच डांबर प्लांट्सवर तातडीने कारवाई करण्याचे आदेश प्रशासनाला देण्यात आले आहेत. तसेच शहराच्या सीमेवरील तुलनेने कमी लोकसंख्या असलेल्या भागांमध्ये हे प्रकल्प स्थलांतरित करण्यासाठी खासगी व्यावसायिकांनाही आवाहन करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले.

डांबर प्लांटही शहराबाहेर हलविण्याचा निर्णय

महापालिकेचा येरवडा येथे सध्या कार्यरत असलेला डांबर प्लांटही शहराबाहेर हलविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. पुढील काळात शहराच्या चारही बाजूंना स्वतंत्रपणे असे प्लांट उभारण्याचे नियोजन असून, त्यासाठी जागांचा शोध सुरू आहे. शिंदेवाडी जकात नाका आणि वाघोली परिसरात नवीन प्लांट उभारण्यासाठी पुढील सहा महिन्यांत कारवाई करण्याचे निर्देश प्रशासनाला देण्यात आल्याची माहिती श्रीनाथ भिमाले यांनी दिली.

# पुणे कृषी महाविद्यालयातील विद्यार्थ्याचा विजेच्या धक्क्याने मृत्यू

बारामती । प्रतिनिधी

पुणे कृषी महाविद्यालयातील विद्यार्थ्याचा वॉटर फिल्टरला विजेचा धक्का लागून झालेल्या मृत्यूच्या घटनेने राज्यभरात संतापाची लाट उसळली असून, या प्रकरणातील दोषींवर तत्काळ कठोर कारवाई करण्याची मागणी कृषी पदवीधर संघटनेने केली आहे. अन्यथा महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद (एमसीएईआर) कार्यालयावर तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा संघटनेने दिला आहे.

चैतन्य कुंडलिक चव्हाण (वय २३, रा. डोंगरगण, ता. आष्टी, जि. बीड) हा पुणे कृषी महाविद्यालयात 'ग्राकिल्चर बिझनेस मॅनेजमेंट' प्रथम वर्षात शिक्षण घेत होता. दि. १४ मार्च रोजी रात्री मेसमधील वॉटर फिल्टरचा वापर करताना त्याला विजेचा तीव धक्का बसला.

गेल्या दहा दिवसांपासून मृत्यूशी झुंज देत असताना उपचारादरम्यान त्याचा दुर्दैवी मृत्यू झाला. या घटनेनंतर कृषी पदवीधर संघटनेचे संस्थापक महेश कडूस पाटील व युवक प्रदेशाध्यक्ष सूरज खोमणे यांनी बारामती येथे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांची भेट घेऊन निवेदन सादर केले.

संघटनेने शासनाकडे चव्हाण कुटुंबाला १ कोटी रुपयांची आर्थिक मदत देण्याची मागणी केली असून, वस्तीगृह अधीक्षक, मेसचालक व संबंधित कर्मचाऱ्यांवर सदोष मनुष्यवधाचे गुन्हे दाखल करण्याची मागणी केली आहे. तसेच राज्यातील सर्व कृषी महाविद्यालयांचे फायर व इलेक्ट्रिकल सेफ्टी ऑडिट तातडीने करून ते नियमित दरमहा करण्याची मागणीही करण्यात आली आहे.या वेळी सूरज खोमणे यांनी प्रशासनाच्या निष्काळजीपणावर टीका करत, मागण्यांकडे दुर्लक्ष झाल्यास तीव आंदोलनाचा इशारा दिला. दरम्यान, कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याचे आदेश देत पीडित कुटुंबाला न्याय देण्याचे आश्वासन दिले.

# महात्मा फुले यांच्या नऊ जुन्या अल्पचरित्रांचा संग्रह प्रकाशित होणार; पुणे विद्यापीठात प्रकाशन सोहळा

पुणे । प्रतिनिधी

महात्मा जोतीराव फुले यांच्या कार्याची ओळख नव्या पिढीला व्हावी यासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात एक खास कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. महात्मा जोतीराव फुले : नऊ जुनी अल्पचरित्रे (१८९१-१९३९) या महत्त्वाच्या ग्रंथाचे प्रकाशन शनिवार, ११ एप्रिल २०२६ रोजी दुपारी ४ वाजता विद्यापीठाच्या मुख्य इमारतीतील संत ज्ञानेश्वर सभागृहात होणार आहे.



या ग्रंथाचे संपादन इतिहासाच्या प्राध्यापिका आणि विभागप्रमुख श्रद्धा कुंभोजकर यांनी केले असून, त्यांना इतिहास विषयाचे संशोधक विद्यार्थी बापूराव घुंगरगांवकर यांची साथ लाभली आहे. या दोघांनीही महात्मा फुले यांच्या विचारांचा आणि कार्याचा अभ्यास करून त्यांच्या विषयी लिहिलेली जुनी अल्पचरित्रे एकत्रित करण्याचे महत्त्वाचे काम केले आहे. या प्रकाशन सोहळयाच्या अध्यक्षस्थानी पुणे विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. सुरेश गोसावी असणार आहेत. तर प्रमुख अतिथी म्हणून महाराष्ट्र शासनाच्या पुरातत्त्व आणि संग्रहालय विभागाचे संचालक डॉ. तेजस गर्ग उपस्थित राहणार आहेत. या मान्यवरांच्या उपस्थितीत होणारा हा कार्यक्रम शैक्षणिक आणि वैचारिक दृष्टिकोनातून महत्त्वाचा मानला जात आहे. महात्मा जोतीराव फुले यांच्या निधनानंतरच्या पहिल्या पन्नास वर्षांत, म्हणजे १८९१ ते १९३९ या कालावधीत विविध लेखकांनी त्यांच्या जीवनावर आधारित नऊ अल्पचरित्रे लिहिली होती. या चरित्रांमध्ये फुले यांच्या कार्याचा, त्यांच्या सामाजिक योगदानाचा आणि त्यांच्या जीवनातील महत्त्वाच्या घटनांचा तपशीलवार आढावा घेतला आहे. विशेष म्हणजे ही चरित्रे विविध जात, वर्ग आणि प्रदेशातील लेखकांनी लिहिलेली असल्याने त्यांना ऐतिहासिकदृष्ट्या अधिक महत्त्व प्राप्त झाले आहे. या नव्या ग्रंथामध्ये आठ मराठी आणि एक इंग्रजी अशा नऊ अल्पचरित्रांचा समावेश करण्यात आला आहे. या सर्व चरित्रांचे एकत्रित पुनर्प्रकाशन प्रथमच करण्यात येत असून, संशोधक आणि वाचकांसाठी हा एक महत्त्वाचा संदर्भग्रंथ ठरणार आहे. महात्मा फुले यांच्या जन्मदिनाच्या द्विशताब्दी वर्षाच्या पार्श्वभूमीवर हा ग्रंथ प्रकाशित होत असल्याने त्याला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. फुले यांच्या कार्याचा वारसा पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचवण्याचा हा महत्त्वाचा प्रयत्न आहे.

# एचपीसीएलची वितरकांवर कारवाई; २७ परवाने

पुणे । प्रतिनिधी

राज्यासह देशात सुरू असलेल्या गॅस आणि इंधनपुरवठ्यावर एचपीसीएल कंपनीने वितरकांवर बारकाईने लक्ष ठेवले असून, नागरिकांना जाणीवपूर्व त्रास देणाऱ्या वितरकांवर कारवाईचा सपाटा लावला आहे. आतापर्यंत २७ वितरकांचे परवाने निलंबित केले आहेत. १४ मार्च ते ७ एप्रिल २०२६ दरम्यान ४३८५ तपासण्या करत ७४ वितरकांविरुद्ध कारवाई केली.

इतर तेल विपणन कंपन्या व राज्य प्रशासनाच्या सहकार्याने ६५७ छापे टाकून ४० गुन्हे दाखल केले, तसेच ३१६३ एलपीजी सिलिंडर जप्त केल्याची माहिती कंपनीच्या वतीने देण्यात आली आहे. निवडक बाजारपेठांमध्ये इंधन व एलपीजीची मागणी वाढल्याने हिंदुस्तान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड (एचपीसीएल) ने देशभरातील पुरवठा व अंमलबजावणी यंत्रणा सक्रिय केली आहे. इंधन आणि एलपीजीचा अखंड पुरवठा सुनिश्चित करताना वितरण व्यवस्थेची सुसूत्रता राखण्यावर कंपनीने भर दिला आहे.

एप्रिलच्या पहिल्या आठवड्यात एचपीसीएलने पुरवठा साखळीची कार्यक्षमता लक्षणीय वाढवली. १ ते ७ एप्रिलदरम्यान कंपनीने २लाख ६४ हजार ५४८ किलो लिटर पेट्रोल (एमएस) आणि ४ लाख ७७ हजार ३० किलो लिटर डिझेल (एचएसडी) विक्रीची नोंद केली. वाढत्या मागणीची पूर्तता करण्यासाठी ४८ हजार ९९ टँकर्सद्वारे पेट्रोल, डिझेल आणि अनुदानित केरोसीन देशभरातील किरकोळ केंद्रांवर पोहोचवले. एलपीजी वितरण व्यवस्थाही पूर्णक्षमतेने कार्यरत असून, या कालावधीत ८९ लाख सिलिंडर वितरित करण्यात आले.स्थलांतरित कामगार व आर्थिक दुर्बल घटकांना लक्षात घेऊन ५ किलोचे १ लाख ८७७५४ फ्री ट्रेड एलपीजी सिलिंडर आणि २ किलोचे १५३३५ सिलिंडर पुरवले आहेत. डिजिटल माध्यमांचा वापर सेवा वितरणात महत्त्वाचा ठरत असून, आयव्हीआरएस, एसएमएस, एचपी पे आणि व्हॉट्सपच्या माध्यमातून ९५ टक्के एलपीजी बुकिंग करण्यात आले.राज्यात इंधन, एलपीजीचा तुटवडा नाही

ग्राहकांच्या हितसंरक्षणासाठी आणि वितरण व्यवस्थेत पारदर्शकता राखण्यासाठी एचपीसीएलने अंमलबजावणी अधिक कडक केली आहे. काही ठिकाणी वाढलेल्या मागणीमुळे तात्पुरता ताण जाणवत असला तरी राज्यासह देशभरात इंधन किंवा एलपीजीचा कोणताही तुटवडा नसल्याचे एचपीसीएलने स्पष्ट केले आहे. ग्राहकांनी घाबरून खरेदी न करता नियमित वापराची पद्धत कायम ठेवावी असे आवाहन कंपनीने केले आहे.